cmyk

## संपादकीय

### केवळ स्वप्नरंजनावर जनता भाळणार नाही!

निवडणुकीच्या प्रचारात उपस्थित होणाऱ्या कुठल्याही अडचणीच्या मुद्याला आपण धार्मिक ध्रुवीकरणाच्या हुकमी एक्क्याने बगल देऊ शकतो, तेवढी आपली हिंदुत्वाची मतपेढी 'स्ट्राँग' आहे, हीच भाजपची निवडणुकीची रणनीती राहिलेली आहे. त्याच जोरावर भाजपने देशातल्या सत्तेच्या चाव्या मिळवलेल्या आहेत. नाही म्हणायला या हिंदुत्वाच्या हुकमी एक्क्याला प्रचारात कधी विकासाची तर कधी राष्ट्रवादाची जोड देण्याचे चातुर्य भाजपने दाखविले आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–७२ | शनिवार दि.२२ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


### भीमा कोरेगाव दंगलीतील आरोपी महेश राऊतला अंतरिम जामीन

नवी दिल्ली: भीमा कोरेगाव दंगल प्रकरणातील आरोपी महेश राऊतला आजीच्या अंत्यविधीचे सोपस्कार पार पाडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि.२१ जून) दोन आठवड्यांचा अंतरिम जामीन मंजूर केला. राऊतच्या जामीन अर्जावर विक्रम नाथ आणि एस. व्ही. एन. भाटी यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. आजीच्या अंत्यसंस्कारानंतर केल्या जाणाऱ्या विधीसाठी २६ जून ते १० जुलैपर्यंत अंतरिम जामीन मंजूर करावा, अशी मागणी राऊतच्या वकिलाने केली. न्यायालयाने ती मान्य केली. महेश राऊतला यापूर्वी जून २०१८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. मात्र, एनआयए या तपास संस्थेने विरोध केल्यानंतर न्यायालयाने जामीनाला स्थगिती दिली होती.

# नाफेडचे पितळ उघडे पडले!

## शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी न करता बाजार समितीतून खरेदी, नाफेडच्या अध्यक्षांनी टाकली रेड



नाशिक। प्रतिनिधी

नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहीर यांनी अचानक नाशिक जिल्ह्यातील नाफेडच्या कांदा खरेदी विक्री केंद्रांवर धाड टाकली. नाफेडच्या केंद्राना अचानक भेट दिल्याने त्यांना गैरकारभार आढळून आला आहे. शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी न करता बाजार समितीतून कांदा खरेदी केला जात असल्याचे यावेळी आढळून आले आहे. यामुळे नाफेडच्या काही केंद्राचे पितळ उघडे पडले आहे.

ऑनलाइन कांदा खरेदी विक्रीमध्ये घोटाळा झाल्याचे निरीक्षण करण्यात आले आहे. कांदा प्रश्नांबाबतीत तक्रार करण्यात आली होती. कोणाला न सांगता अचानक भेट दिली. विक्री केलेल्या मालापेक्षा दुप्पट कांदा गोडावूनमध्ये आढळून आला आहे. आधीच काही शेतकऱ्यांकडून ◀◀ पान २ वर

### दलाली होत असल्याने शेतकऱ्यांना फटका

शेतकऱ्यांना दुप्पट नफा देण्यासाठी नाफेडची स्थापना करण्यात आली आहे. मात्र वास्तवात तसे घडत नसल्याचा शेरा नाफेडच्या अध्यक्षांनी दिला आहे. कांदा खरेदी – विक्री व्यवहारात दलाली होत असल्याने शेतकऱ्यांना पूर्ण पैसे मिळत नसल्याचे उघडकीस आले आहे. बाजार समितीतून कांदा माल खरेदी करणे अवघड आहे पण आम्ही, याबाबतीत विचार करत असल्याचे नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहीर म्हणाले.

### समिती नेमून होणार चौकशी

नाफेडच्या अनेक केंद्रांवर गैर कारभार आढळून आला आहे. यामध्ये नाफेडचे अनेक अधिकारी देखील गैरकारभार करत असल्याचे समोर आले आहे. नाफेडच्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी समिती गठित करणार असून, नाफेडच्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणार, तसेच काही व्यापारी आणि एजंट यांना कायमस्वरूपी ब्लॅकलिस्ट करणार. यासाठी दिल्लीत एक कमिटी तयार करणार असून समितीमार्फत केंद्रांची तपासणी केली जाईल; असे नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहिर यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांची लूट आणि विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त-नाना पटोले

मुंबई । प्रतिनिधी



केंद्रातील आणि राज्यातील भाजपा सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडून सत्ताधारी मजा मारत आहेत. राज्यात कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडलेली आहे, महागाई, बेरोजगारीने लोकांना जगणे कठिण झाले आहे. सरकारने बियाणे आणि खतांचा काळाबाजार करून शेतकऱ्यांची लूट सुरु आहे. निट चे पेपर फोडून विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या भ्रष्टाचारी महायुती सरकारविरोधात काँग्रेसने शुक्रवारी राज्यभरात चिखल फेको आंदोलन केल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्यातील भाजपा सरकारमध्ये भ्रष्टाचार बोकाळला आहे. डीबीटी योजनेतून शेतकऱ्यांना किटकनाशके, स्प्रे पंप, खते, औषधे दिली जातात पण त्यात २७०० रुपयांच्या स्प्रे पंपची किंमत वाढवून ४५०० रुपये करण्यात आली इतर वस्तुही वाढीव दराने खरेदी करुन भ्रष्टाचार केला. या योजनेत बदल करायचा असल्यास कॅबिनेटची मंजुरी लागते असे कृषी आयुक्तांनी निदर्शनास आणून दिले असता ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### हंगामी लोकसभा अध्यक्षांच्या नियुक्तीला काँग्रेसचा विरोध

नवी दिल्ली : संसदेचे पहिले अधिवेशन सुरू होण्याच्या आधीच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये हंगामी लोकसभा अध्यक्षांच्या नियुक्तीवरून वाद सुरू झाल्याचे बघायला मिळाले आहे. भाजपने हंगामी लोकसभा अध्यक्षपदी खासदार भतृहरी मेहताब यांची नियुक्ती केली. मेहताब यांना शुक्रवारी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी या पदाची शपथ दिली. मात्र, काँग्रेसने मेहताब यांच्या नियुक्तीला विरोध केला आहे. मेहताब यांची हंगामी लोकसभा अध्यक्षपदी नियुक्ती करून भाजपने सांसदीय परंपरेचे उल्लंघन केल्याचा आरोप काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला आहे. सांसदीय परंपरेनुसार लोकसभेत सर्वाधिक काळ खासदार असलेल्या व्यक्तीची हंगामी लोकसभा अध्यक्षपदी नियुक्ती केली जाते.

### आंदोलन कसे करावे हाकेंकडून शिका–पंकजा मुंडे

बीड: ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचे जालन्याच्या वडीगोद्री येथे गेल्या आठ दिवसांपासून उपोषण सुरु आहे. या आरक्षणाचे कौतुक भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी केले आहे. या माध्यमातून त्यांनी नाव न घेता मनोज जरांगे यांनाही टोला लगावला आहे. आंदोलन कसे करावे, सालस, अभ्यासपूर्ण आणि भावनांना हात घालताना मुद्दा मांडताना घटनेबद्दल आदर ठेवणे शिकायचे असेल तर वडी गोद्रीमध्ये पहावाह रे वाह.., असे पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२० जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १०.०० क्विंटल | २,३३५ | २,७०० | २,४१६ |
| ज्वारी/हायब्रिड : १६.५० क्विंटल | २,००० | ३,२०१ | २,४४३ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,२०१ | ८,२०१ | ८,२०१ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ८.५० क्विंटल | १,८०० | २,६७० | २,२८२ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: १४५.५० क्विंटल | ४,३२५ | ४,४५१ | ४,४०८ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,५११ | ६,५११ | ६,५११ |

# हाके जिंकले; ओबीसींच्या महाबैठकीत ४ मोठे निर्णय

## २९ जूनला सर्वपक्षीय बैठक; आज मंत्र्यांचे शिष्टमंडळ आंदोलनकर्त्यांना भेटणार



मुंबई । प्रतिनिधी

गेल्या ९ दिवसापासून ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये म्हणून वडीगोद्री येथे लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या आंदोलनाला यश आले असून राज्य सरकारने ओबीसींच्या ४ महत्वाच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यामुळे एकप्रकारे हाके जिंकले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी ओबीसी नेत्यांचे म्हणणे ऐकून घेतले. या बैठकीत चार मोठे निर्णय घेण्यात आले. या बैठकीनंतर मंत्री छगन भुजबळ यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर चार निर्णय काय–काय घेण्यात आले असल्याचे भुजबळ म्हणाले.

ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी महाराष्ट्रातील ओबीसी समाजाच्या प्रमुख नेत्यांची आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीत ओबीसी नेते प्रकाश शेंडगे आणि मंत्री छगन भुजबळ यांनी आक्रमकपणे भूमिका मांडली.

### बैठकीतील महत्वाचे मुद्दे

- आज मंत्र्यांचे शिष्टमंडळ उपोषणस्थळी जाणार
- २९ जूनला सर्वपक्षीय बैठक होणार
- जातीच्या नोंदी आधारला सलग्न करणार
- खोट्या नोंदीवर प्रमाणपत्र घेणाऱ्यांवर कारवाई होणार
- ओबीसींसाठी मंत्रीमंडळ उपसमिती स्थापणार
- सरसकट आरक्षण शक्य नाही
- सगेसोयरेबाबत अधिवेशन काळात सर्वपक्षीय बैठक घेणार
- निवडणुकीनंतर ओबीसींवर हल्ले करणाऱ्यांवर कारवाई होणार

### प्रकाश शेंडगे आक्रमक

माजी मंत्री प्रकाश शेंडगे यांनीही आक्रमक भूमिका मांडली. त्यानुसार, सगेसोयरेबाबत अनेक खोट्या नोंदी झालेल्या आहेत, त्या आधी रद्द करा, अशी मागणी शेंडगे यांनी केली. तसेच, ८० टक्के मराठा ओबीसीत घुसवण्यात आल्याचे बोलले जात आहे. मग कसा काय ओबीसीला धक्का लागत नाही ?, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

### हाकेंच्या शिष्टमंडळाची मागणी

सगेसोयरेंबाबत जी मागणी होते आहे ती न्यायालयात टिकेल का?. नोंदी ह्या आधार आणि पॅनकार्डसोबत लिंक करण्याची हाकेंच्या प्रतिनिधींची मागणी आहे. कुणबी दाखल्यांसंदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची देखील मागणी ओबीसी नेत्यांनी व हाके यांच्या शिष्टमंडळाने केली आहे.

### कोणाची काय भुमिका

#### पंकजा मुंडेंनी ५४ लाख नोंदीचा मुद्दा लावून धरला

ओबीसींमध्ये अनेक जातींचा समावेश आहे, सरकारच्या एका भूमिकेचा त्यावर परिणाम होऊ शकतो, असे म्हणत ओबीसी नेत्यांनी राज्य सरकारपुढे आपले भूमिका मांडली. सरकारने दबावाखाली दाखले दिले असल्यास चौकशी करावी. तसेच, ५४ लाख नोंदी कशाच्या आधारावर दिल्या आहेत. त्यामुळे ओबीसीला कसा धक्का बसत नाही, याचेही स्पष्टीकरण सरकारने द्यावे अशी भूमिका ओबीसी नेत्यांनी बैठकीत घेतल्याची माहिती आहे. तर, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागत नाही, याची स्पष्टता सरकारने करावी, अशी मागणी पंकजा मुंडेंनी केली आहे.

#### छगन भुजबळांच्या मागण्या

बांठिया आयोगाचा रिपोर्ट आम्हाला मान्य नाहीय. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करावी. ओबीसींसाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करा. सगेसोयरे सूचना आणि हरकतींबाबत श्वेत पत्रिका काढा. जातपडताळणी नियम असताना सगे–सोयरे अध्यादेशाची गरज का ? सगेसोयरे बाबत अध्यादेश काढू नका, अशी भूमिका भुजबळ यांनी मांडली. सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेऊन नंतर निर्णय घ्या, घाई करू नका असे म्हणत आंदोलकांचे उपोषण लवकर सोडवणे आवश्यक असल्याचीही भूमिका भुजबळांनी मांडली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी ओबीसी नेत्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या. या बैठकीत चार मोठे निर्णय घेण्यात आले. या बैठकीनंतर मंत्री छगन भुजबळ यांनी प्रसारमाध्यमांना ◀◀ पान २ वर

## ९ मंत्री पाडणार, १३ तारखेनंतर नावे सांगतो

### माधव पॅटर्न मी सुरु केला का?, मनोज जरांगे यांचा सवाल



#### जरांगे काय म्हणाले?

- भुजबळांचे राजकीय करीअर उध्दवस्त करणार
- नोंदी रद्द करण्याच्या भानगडीत पडू नका
- दंड थोपाटून मराठा आरक्षण ओबीसीतूनच घेणार
- सगळे ओबीसी नेते एकत्र झाले तरी मी एकटाच त्यांना पुरेसा
- हाकेंचे आंदोलन येवल्यावाल्यांचे पुरस्कृत
- पडलेली राज्यातील गँग हाकेंना साथ देतेय

संभाजीनगर । प्रतिनिधी

आम्ही आंदोलन उभे केले म्हणून तुम्ही तिथे आंदोलन होतं करत आहात का? आम्हाला खिंडीत पकडून डाव साधत आहात. मी येत्या निवडणुकीमध्ये ९ मंत्री पाडणार आहे. १३ तारखेनंतर त्यांची नावे सांगतो असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. त्यामुळे आता मराठा विरुद्ध ओबीसी पुन्हा एकदा वाद रंगण्याची चिन्हे आहेत. तसेच जातीवाद आम्ही सुरु केला म्हणता, तर माधव पॅटर्न मी सुरू केला का? प्रतिमोर्चा कोणी काढला? कोणी जातीवाद केला? अशी विचारणा त्यांनी केली.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ओबीसी नेते ◀◀ पान २ वर

## अरे याला शिक्षण द्या आधी, माझ्यासमोर बोलायची लायकी नाही

### लक्ष्मण हाकेंचा जरांगे पाटलांवर हल्लाबोल



#### लक्ष्मण हाके काय म्हणाले?

- भुजबळांना पराभूत करणारा तु कोण?
- ओबीसी आरक्षणाचा ७० वर्षाचा जावई शोध कोणी काढला?
- कुणबी नोंदी बोगस, त्या अगोदर रद्द करा
- जातीचे प्रमाणपत्र थांबवा, श्वेत पत्रिका काढा
- कुणबी नोंदी या पॅन, आधारला सलग्न करा

वडीगोद्री । प्रतिनिधी

जरांगे तुमची माझ्यासमोर बोलायची लायकी नाही. तुमच्या सल्लागारांना माझ्यासमोर बोलायला सांगा. कारण मंडल आयोग १९९३–९४ मध्ये लागू झाला आहे आणि ७० वर्षे आणले कुठून? असा सवाल करत लक्ष्मण हाके म्हणाले, अरे याला शिक्षण द्या आधी, माझ्यासमोर बोलायची लायकी नाही, असा हल्लाबोल हाके यांनी मनोज जरांगे यांच्यावर केला.

◀◀ पान २ वर

## काश्मीरमध्ये लवकरच उभारणार महाराष्ट्र सदन

### सार्वजनिक बांधकाम यांची माहिती, ९ कोटी ३० लाखांची तरतूद

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने काश्मीरमध्ये आता लवकरच महाराष्ट्र सदन उभारण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. त्यादृष्टीने काश्मीरमध्ये जमीन खरेदी करण्यासाठी विभागाच्या वतीने ९ कोटी ३० लाख २४ हजार रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली.

या संदर्भात मंत्री चव्हाण यांनी सांगितले की, जम्मू आणि काश्मिर सरकारने बडगाम जिल्ह्यातील इच्चगाम तालुक्यातील २.५० एकर (२० कॅनल) जमीन महाराष्ट्र सरकारला तेथे महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी प्रदान केलेली आहे. जमीन खरेदीची प्रक्रिया महाराष्ट्र व जम्मू–कश्मिर सरकार यांच्यावतीने पूर्ण झाली आहे. महाराष्ट्र सदन उभारण्याच्यादृष्टीने दोन्ही राज्यात आवश्यक प्रक्रिया करण्याच्यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आता या भूखंडावरील त्या जागेवर उभे राहणारे महाराष्ट्र सदन कश्या स्वरुपाचे असावे व त्यामध्ये कोणत्या सोयी–सुविधा असतील याच्या नियोजन व आराखड्याची प्रक्रिया सुरु आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष महाराष्ट्र सदन उभारणीच्या कामाला सुरुवात होईल व लवकरच कश्मिरमध्ये महाराष्ट्र सदन उभे राहिल असा विश्वास मंत्री चव्हाण यांनी व्यक्त केला.

#### बडगाम येथे घेणार २.५० एकर जमिन

बडगाम येथे महाराष्ट्र सरकारच्यावतीने बांधण्यात येणाऱ्या महाराष्ट्र सदनासाठी आवश्यक असलेल्या २.५० एकर जमिनीसाठी महाराष्ट्र सरकारने ९ कोटी ३० लाख २४ हजार रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे, अशी माहिती मंत्री चव्हाण यांनी दिली.

## उच्च न्यायालयाची अरविंद केजरीवालांच्या जामीनाला स्थगिती

नवी दिल्ली। वृतसंस्था

दिल्लीतील कथित मद्य धोरण प्रकरणातील मनी लॉड्रिंग प्रकरणी अटक असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना गुरुवारी राऊस एव्हेन्यू न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. दरम्यान, या आदेशाविरोधात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी (दि.२१) दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणी उच्च न्यायालयातील सुनावणी पूर्ण होईपर्यंत त्यांच्या जामिनाला स्थगिती देण्यात आली. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकल्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयाने ईडीच्या स्थगिती अर्जावर अंतिम निर्णय होईपर्यंत अरविंद केजरीवाल यांच्या जामीनाला स्थगिती दिली आहे.

सुनावणीनंतर एएसजी एसव्ही राजू म्हणाले की, ''केजरीवाल यांच्या जामीन आदेशाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. अंतिम आदेश ३–४ दिवसांत येईल. जामीन रद्द करण्यावर ◀◀ पान २ वर


छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ (Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352
महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
• डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता-पायात मुंग्या येणे)
• झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
• व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
• बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
• स्मृती भंग (विसरभोळेपणा)
• लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
• स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या
नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) मो.9075387638


cmyk

२ राज्य लोकतंत्र संपादकीय.... शनिवार दि.२२ जून २०२४

अग्रलेख

# केवळ स्वप्नरंजनावर जनता भाळणार नाही!

निवडणुकीच्या प्रचारात उपस्थित होणाऱ्या कुठल्याही अडचणीच्या मुद्याला आपण धार्मिक ध्रुवीकरणाच्या हुकमी एक्क्याने बगल देऊ शकतो, तेवढी आपली हिंदुत्वाची मतपेढी 'स्ट्राँग' आहे, हीच भाजपची निवडणुकीची रणनीती राहिलेली आहे. त्याच जोरावर भाजपने देशातल्या सत्तेच्या चाव्या मिळवलेल्या आहेत. नाही म्हणायला या हिंदुत्वाच्या हुकमी एक्क्याला प्रचारात कधी विकासाची तर कधी राष्ट्रवादाची जोड देण्याचे चातुर्य भाजपने दाखविले आहे. त्यातूनच २०१४ व २०१९ च्या निवडणुकीत भाजपने दणदणीत विजयही मिळवला.

मात्र, कुठलीही गोष्ट अति झाली की, त्याची माती होते हा सृष्टीचा नियमच आहे. भावनिक मुद्यांचा आधार घेऊन एकदा, दोनदा जनतेची दिशाभूल करता येते. मात्र, जनतेला जेव्हा त्यांच्या रोजच्या जगण्यातील समस्यांचे चटके बसतात तेव्हा त्यावर हे भावनिक मुद्दे उपचार ठरू शकत नाहीत.

अत्यंत आत्मविश्वासाने 'चारसौ पारची' घोषणा देऊन तिसऱ्या सलग सत्तारोहणास आतूर झालेल्या भाजपच्या 'अजेय जोडी'ला निवडणूक निकालाने वास्तवाचे चटके दिल्यावर मोदी-शहांना त्याची जाणीव झाली असेलच. त्यामुळेच मोदींनी निकालानंतरच्या पहिल्याच भाषणात आपली भाषा बदलून 'एनडीए' सरकारचा उल्लेख वारंवार केला आणि नितीशकुमार व चंद्राबाबू यांच्यावर स्तुतिसुमनेही उधळली.

हा राजकारणाचा भाग झाला. हे सहमतीचे राजकारण परस्परांच्या गरजेवर अवलंबून असते व त्याचा पुरेपूर अनुभव भाजप, नितीशकुमार, चंद्राबाबू यांनी घेतलेला आहे व परस्परांना दिलेलाही आहे. मूळ मुद्दा आहे तो मतदारांनी भाजपला दिलेल्या संदेशाचा! हा संदेश हेच सांगतो की, जरी मतदारांचे आजही हिंदुत्वाच्या मुद्यावर प्रेम असले तरी त्याच्या अतिरेकाने आता त्यांना या मुद्याचे अपचन होते आहे. त्यामुळे भाजपला आपला जनाधार टिकवायचा तर सामान्यांचे रोजच्या जगण्यातले प्रश्न, समस्या सोडविण्याला प्राधान्य द्यावे लागेल. केवळ स्वप्नरंजनावर जनता भाळणार नाही तर त्यांच्या जगण्याचे प्रश्न सरकारला गांभीर्याने घ्यावे लागतील. भाजपकडून या निवडणूक प्रचारात विकासाचा दावा केला गेला. मात्र, मतदारांनी त्याची योग चिकित्सा करून भाजपला आरसा दाखविला. भाजपने बहुसंख्यवादातून जी दहशत देशात निर्माण केली त्याची तेवढीच जोरदार प्रतिक्रिया मुस्लिम, दलित मतदारांनी दिली. महाराष्ट्रात पक्ष फोडाफोडीचे जे राजकारण झाले ते मतदारांना अजिबात भावले नाही. त्याचीही कडक प्रतिक्रिया मतदारांनी भाजपला दिली. त्याच्या परिणामी 'मी पुन्हा येईन' म्हणणाऱ्या फडणवीसांना 'मी पुन्हा जाईन'चा राग आळवावा लागतो आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्यात नेतृत्वबदल पक्षासाठी योग्य नसल्याचे भाजप श्रेष्ठींच्या लक्षात आल्याने तूर्त फडणवीसांचे उपमुख्यमंत्रिपद व राज्याचे नेतृत्व कायम राहिले असले तरी पक्षात एककल्ली कारभार चालणार नाही, सर्वांना सोबत घेऊन सहमतीने काम करावे लागेल, हा संदेश फडणवीसांना मिळाला आहेच. प. बंगालमध्ये संदेशखाली प्रकरणावरून भाजपने ध्रुवीकरणाचा मोठा प्रयत्न केला होता व यावेळी भाजप प. बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला धोबीपछाड देणार असेच वातावरण निर्माण करण्यात आले होते. मात्र, मतदारांनी भाजपला तेथेही जमिनीवर आणले. राममंदिराचे उद्घाटन करण्यात आलेल्या वातावरणनिर्मितीने उत्तर प्रदेश एकहाती जिंकू असा आत्मविश्वास भाजपला होता. मात्र, मतदारांनी तेथेही भाजपला जबरदस्त तडाखा दिला. एकंदर हिंदुत्वाचे अपचन मतदारांना झाले आहे, हेच मतदारांनी निकालातून भाजपला दाखवून दिले आहे. त्यामुळेच भाजप व या पक्षाची मातृसंस्था रा. स्व. संघाची भाषा आता बदललेली दिसते आहे. सरसंघचालकांनी भाजपच्या 'अजेय जोडी'चे निकालानंतर बौद्धिक घेताना मणिपूर प्रकरणावरून सरकारला व मोदींना अत्यंत खडे बोल सुनावले. केवळ ध्रुवीकरणाच्या हट्टापायी भाजपने मणिपूरमधील मैतेई समाजाची पाठराखण करणाऱ्या मुख्यमंत्र्यांना मूक पाठिंबा दिला व हिंसाचाराकडे दुर्लक्ष केले. त्याच्या परिणामी मणिपूरमधल्या दोन्ही लोकसभा जागा भाजपला गमवाव्या लागल्या. आता चूक लक्षात आलेल्या भाजपने मणिपूरचा हिंसाचार थांबविण्याकडे लक्ष वळवले आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी मैतेई व कुकी या दोन्ही समाजांच्या प्रतिनिधींसोबत एकत्रित बैठक घेतली आणि या बैठकीपासून उघडपणे मैतेई समाजाची पाठराखण करणाऱ्या मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांना दूर ठेवण्यात आले. अर्थात या प्रयत्नांना आता बराच उशीर झाला असल्याने अशा बैठकांनी मणिपूरची आग लगेच विझण्याची शक्यता कमीच. एकंदर ध्रुवीकरणाच्या अतिरेकी राजकारणात सामान्य जनतेला स्वारस्य राहिलेले नाही तर त्यांना स्वत:च्या पोटापाण्याचे, रोजगाराचे, सामाजिक शांततेचे प्रश्न जास्त प्राधान्याचे असल्याचे कळले आहे हे निवडणूक निकालातून मतदारांनी भाजपला स्पष्टपणे सांगितले आहे. त्यामुळे या सरकारला आता केवळ निवडणूक प्रचारापुरते नव्हे तर प्रत्यक्ष कारभारातही 'सबका साथ सबका विकास, सबका विश्वास' हेच धोरण अवलंबावे लागेल अन्यथा लोकसभा निवडणूक निकालाच्या संदेशाची पुनरावृत्ती यापुढील प्रत्येक निवडणुकीत होत राहील.

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे आंतरराष्ट्रीय योगा दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

**आज दिनांक २१ जून आंतरराष्ट्रीय योगा दिवस या अनुषंगाने श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे आंतरराष्ट्रीय योगा दिवस आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी योग गुरु श्री श्री रविशंकर जी यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री जैन सर ,सचिव श्री पारगावकर सर ,मुख्याध्यापक हंसे सर उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम तसेच आर्ट ऑफ लिव्हींगचे शिक्षक श्री. मयुरेश आदी उपस्थित होते.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला योगाचे आपल्या दैनंदिन जीवनातील महत्त्व व्हिडिओद्वारे दाखवण्यात आले , त्याचप्रमाणे निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी इयत्ता सातवीतील श्रावणी डोंगरे व वेदिक कारगुडे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिवसाबद्दल माहिती दिली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त श्री मयुरेश यांनी प्राणायाम,भामरी प्राणायाम आणि अतिशय सोपे आसन घेतले तसेच गुरुजींच्या



आवाजातील ध्यान घेण्यात आले यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री जैन सर व इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी अपेक्षा भालशंकर यांच्या वाढदिवस देखील साजरा करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी तेजल कुटे व शुभ्रा जाधव या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इयत्ता पाचवीतील विद्यार्थी सोहम नवले यांनी केले या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक वृंद शाळेतील विश्वस्त विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भाजपा कामगार मोर्चा बीडच्या वतीने योग दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

जागतिक योगा दिनानिमित्त भाजपा कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा महामंत्री विजय हरगुडे, हनुमंत लांडगे,कार्यालयीन सचिव भुषण पाटील यांच्या आदेशानुसार,संस्कृती विद्यालय बीड येथे भाजपा कामगार मोर्चा बीडच्या वतीने योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी योगशिक्षक दत्ताजी नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपाचे युवा नेते बालाजी भाऊ पवार व दादासाहेब लक्ष्मण नन्नवरे प्रदेश सचिव तथा मराठवाडा अध्यक्ष, ओमप्रकाश सदानंद गिरी बीड जिल्हा अध्यक्ष यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये संस्कृती निवासी विद्यालयाचे २६५ विदयार्थी शिक्षक गण,संस्थापक अध्यक्ष दत्ता नलावडे, बालाजी पवार तसेच नेहरू युवा केंद्राचे पदाधिकारी उपस्थित होते. योग शिबीर संपल्यावर विद्यार्थी मित्रांना दुध व अल्पोपहार देऊन योग शिबीराची सांगता झाली.

## विनायक प्राथमिक शाळेत जागतिक योग दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

जागतिक योग दिनाच्या निमित्ताने विनायक प्राथमिक शाळा पेठ बीड येथे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.किर्तीताई पांगारकर यांच्या मार्गदर्शनाखाली योग साधनेचे आयोजन करण्यात आले.शाळेतील योग प्रशिक्षक शिक्षक श्री.तन्वीर पठाण सर,शिवलिंग क्षीरसागर सर, सुनीता चौधरी मॅडम,शैलजा बावस्कर मॅडम,बाळू काळे सर,भारती क्षीरसागर मॅडम, सिमा उदगीरकर मॅडम,वर्षा म्हेत्रे मॅडम, संजीवनी पवळ मॅडम,विवेक गव्हाणे सर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना योगसाधनेचे



महत्व समजावून सांगितले.काही योगासनांची प्रात्यक्षिके स्वतः करून विद्यार्थ्यांना काही आसन करावयास लावले.योग दिनाच्या निमित्ताने शाळेतील मुख्याध्यापिका सौ.किर्तीताई पांगारकर,सर्व शिक्षक ,शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी सहभागी झाले होते.अतिशय उत्साहपूर्ण वातावरणामध्ये योग दिनाचे यशस्वी आयोजन शाळेमध्ये करण्यात आले.

## आंतरराष्ट्रीय योग दिन ; पंकजाताई मुंडे यांचं युट्यूब लाईव्ह ; ३५ हजारांहून अधिक व्हुअर्सनी नोंदवला सहभाग

### विविध प्रकारच्या योगांचे दिले धडे ; सामाजिक प्रबोधनही केलं

मुंबई । प्रतिनिधी

**राजकारण, समाजकारणासह सोशल मिडियावरही सतत सक्रिय असलेल्या भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त युट्यूब लाईव्ह वरून कार्यकर्त्यांना विविध प्रकारच्या योगांचे धडे दिले. राज्यभरातील सुमारे ३५ हजारांहून अधिक व्हुअर्सनी या युट्यूब लाईव्ह मध्ये सहभाग घेतला होता.**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज कुठल्याही जाहीर कार्यक्रमात सहभाग न घेता पंकजाताई मुंडे यांनी एका आगळ्या वेगळ्या पध्दतीने योग दिन साजरा करण्याचे ठरवले. खांद्याच्या दुखापतीमुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले. आपल्या जीवनात योगाचे अनन्यसाधारण असे महत्व आहे. देशाचा हा प्राचीन ठेवा आज संपूर्ण जगाने स्विकारलायं. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः यात सहभागी होत असल्यामुळे संपूर्ण जगात याचा अधिक वेगाने प्रसार झाला.



योगामुळे शरीरा बरोबरच आतील अवयवांचा देखील व्यायाम होतो तसेच आत्म्याचे देखील शुध्दीकरण होते असं पंकजाताई म्हणाल्या. यावेळी त्यांनी कपालभाती, भस्त्रिका, भ्रामरी, अनुलोम विलोम, ओमकार असे विविध प्रकारचे योगा प्रात्यक्षिक करून दाखवले. पंकजाताईंच्या आजच्या या उपक्रमांचा राज्यभरातील हजारो लोकांनी उत्स्फूर्त लाभ घेत त्यांचं कमेंट्स करून खास अभिनंदन केलं. अनेकांनी आपल्याला यातून उर्जा मिळाल्याचही म्हटलं.

**मन:शांतीसाठी योग महत्वाचा**

योगा बरोबरच पंकजाताई मुंडे यांनी यावेळी प्रबोधनात्मक विचार व्यक्त केले. आयुष्यात प्रत्येक जण वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असतो. राजकारण, समाजकारण, व्यवसाय करत असताना आपल्याला जीवनात अनेक चढ उतार, सुख दुःखाचे प्रसंग येत असतात. आज कलियुग आहे. कितीही संघर्ष आला तरी चांगले आचार विचार व संस्कारांना सोबत घेऊनच आपल्याला पुढे चालायचे आहे. ध्यान, प्राणायाम,योगासने नियमित केल्याने आरोग्या सोबतच मनस्वास्थ्य लाभते असं त्या यावेळी म्हणाल्या.

## स्व.विनायक मेटे साहेब यांच्या जयंतीनिमित्त 'कृतज्ञता सप्ताह'

### ३० जून रोजी होणार जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र लोकनेते विनायकराव मेटे यांचा २०२२ साली मराठा आरक्षण बैठकीला मुंबईला जात असताना मुंबई पुणे दुर्तगती मार्गावर अपघात झाला आणि त्यात ते आपल्याला सोडून गेले आयुष्यभर समजातील विविध घटकासाठी त्यांचे कार्य विसरता येणारे नाही. त्यामुळे ३० जून रोजी त्यानीची जयंतीचे औचित्य साधून त्यांच्यावर प्रेम करणारे कार्यकर्ते, हितचींतक ''कृतज्ञता सप्ताह'' म्हणून साजरा करणार आहेत.**

लोकनेते विनायकराव मेटे यांची ३० जून रोजी जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने त्यांच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी आणि त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभर विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजिन करण्यात आले आहेत आणि दि.. २३ जून ते २९ जून या कालावधीत हा ''कृतज्ञता सप्ताह'' आयोजत करण्यात आला आहे. यात स्व.विनायकराव मेटे यांनी त्यांचा वाढदिवस नेहमी समजिक उपक्रमानी साजरे केले त्यांना अभिप्रेत अश्या कार्यक्रमानी त्यांची जयंती साजरी करण्याचा मानस त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या चाहत्यांनी केला आहे. जिल्ह्यासह राज्यात रक्तदान शिबिर , विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, वृक्षारोपण, अल्प दरात फिल्टरचे वाटप, रक्त तपासणी शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, स्वच्छता मोहीम, निराधारांना ब्लँकेट वाटप, गरीब विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप अशा विविध उपक्रमांनी ही जयंती साजरी होणार आहे.



## सत्तेच्या दबावाखाली चुकीचे दाखले दिले आहेत का? असल्यास त्याची चौकशी करा

### पंकजाताई मुंडे यांची मागणी



मुंबई । प्रतिनिधी

**सत्तेचा गैरवापर करुन किंवा दबावाखाली चुकीचे सर्टिफिकेट दिले गेले आहेत का? असल्यास त्याची चौकशी करावी, तसेच ओबीसी आरक्षणाला धक्का कसा लागत नाही याबद्दलची स्पष्टता करावी अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज ट्विटद्वारे सरकारकडे केली.**

सहयाद्री अतिथीगृहात आज राज्यातील प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक सरकारने बोलावली होती. वडीगोद्री येथे सुरू असलेल्या आंदोलना संदर्भात ही बैठक होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, पंकजाताई मुंडे यांच्यासह प्रमुख नेते यावेळी उपस्थित होते. लक्ष्मण हाके यांनी सुरू केलेल्या उपोषणा संदर्भात पंकजाताई मुंडे यांनी ट्विट करत सरकारकडे मागणी केली आहे ,त्या म्हणाल्या, राज्यातील काही महत्वाच्या नेत्यांचे शिष्टमंडळ हे लक्ष्मण हाके यांना वडीगोद्री येथे जाऊन भेटल्याचे समजते. ते योग्यच आहे. हाकेंचे उपोषण हे त्यांचे नसून हा कायद्याच्या चौकटीत सर्वांना समान न्याय देण्यासंदर्भातील भूमिका आहे. सत्तेचा गैरवापर करुन किंवा दबावाखाली चुकीचे सर्टिफिकेट दिले गेले आहेत का? असल्यास त्याची चौकशी करावी, तसेच ओबीसी आरक्षणाला धक्का कसा लागत नाही याबद्दलची स्पष्टता करावी. या साध्या त्यांच्या दोन मागण्या इतर मागण्यांसमवेत आहेत. शिष्टमंडळाने उपोषणास भेट दिली असली तरी राज्याच्या प्रमुखांनी तिथे जाऊन भेट द्यावी, म्हणजे या समस्त राज्यातील बहुजनांना सन्मान दिल्यासारखे होईल असं त्या म्हणाल्या.

## पान १वरून...

**शेतकऱ्यांची लूट आणि विद्यार्थ्यांचे**

त्या कृषी आयुक्तांचीच बदली करण्यात आली. या योजनेतून ११ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ झाला असता पण भाजपा सरकारने भ्रष्टाचार करुन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, केंद्र सरकारने काही पिकांची एमएसपी वाढवली पण या वाढीचा महागाईशी तुलना केली असती अत्यंत तुटपुंजी वाढ आहे. महागाईच्या दराप्रमाणे ही एमएसपी वाढ नाही. डिझेल, खते, बियाणे, शेती साहित्यांच्या वाढलेल्या किमती पहाता शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत नाही. राज्यात प्रचंड दुष्काळ आहे, शेतकऱ्यांच्या फळबागा उद्ध्वस्त झाल्या आहेत पण सरकार मात्र दुष्काळसदृष्य परिस्थीती आहे म्हणून शेतकऱ्यांची थट्टा करत आहे. शेतकऱ्यांच्या बांधांवर जाऊन काँग्रेसने शेतकऱ्यांना आधार दिला. निट परीक्षा रद्द करा, पोलीस भरती पुढे ढकला. भाजपाच्या राज्यात सातत्याने पेपरफुटी होत आहे. नीट परिक्षेतही पेपरफुटला असल्याने ही परिक्षाच रद्द करण्याची मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. आधी पेपरफुटलाच नाही असे केंद्रीय मंत्र्यांनी जाहीर केले पण राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेतली तेंव्हा केंद्र सरकारला जाग आली. काँग्रेसने केलेल्या आंदोलनात नीट परीक्षा रद्द करावी, अशी मागणीही केली आहे. तसेच राज्यात पाऊस सुरु असताना पोलीस भरती सुरु ठेवून भाजपा सरकार उमेदवारांच्या भवितव्याशी खेळत आहे. ही भरती पुढे ढकलावी अशी मागणी केली असतानाही सरकार त्याकडे लक्ष देत नाही अशी टीकाही यावेळी त्यांनी केली. जामनेरमध्ये भिल्ल आदिवासी समाजातील सहा वर्षांच्या मुलीवर बलात्कार करुन तीची हत्या करण्यात आल्याने लोक संतप्त झाले. पोलीस स्टेशनवर हा समाज गेला असता शिंदे नावाच्या ठाणे अंमलदाराने या लोकांना हुसकावून लावले, मंत्र्याचा आशिर्वाद आहे मला कोणी काही करू शकत नाही असा उद्दामपणा केला. आता पोलीस या आदिवासी समाजालाच गोवण्याचा प्रयत्न करत आहे, असे नाना पटोले म्हणाले. या पत्रकार परिषदेला प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान उपस्थित होते.

**ईव्हीएमवर भाजपा उमेदवारांचाही आक्षेप..**

ईव्हीएमवर जनतेचा विश्वास नाही त्यामुळे मतपत्रिकेवरच मतदान घ्यावे अशी मागणी देशभरातून केली जात आहे. पण भाजपा सरकार मात्र ईव्हीएमवरच निवडणूका घेत आहे. विरोधी पक्षांचेही ईव्हीएम वर आक्षेप आहेत पण आता भाजपाच्या उमेदवारांचाही ईव्हीएमवर विश्वास राहिलेला नाही. ईव्हीएमवर देशभरातून ८ उमेदवारांनी आक्षेप नोंदवला त्यात भाजपाचे तिघेजण आहेत. महाराष्ट्रातील डॉ. सुजय विखे पाटील हे भाजपाचे उमेदवार आहेत. आतातरी भाजपा, केंद्र सरकार व निवडणुक आयोगाने गांभीर्य ओळखावे व मतपत्रिकेवर मतदान घ्यावे असेही नाना पटोले म्हणाले.

---------

**नाफेडचे पितळ**

कांदा खरेदी करुन नाफेडकडून पैसे वसूल केले जातात. ५ ते ६ ठिकाणी चुकीच्या पध्दतीने काम सुरु असल्याचे आढळून आले आहे. दरम्यान, कांदा खरेदी ही शेतकऱ्यांकडून केली जात नाही. नाफेड हे शेतकऱ्यांसाठी आहे पण तसे कामकाज दिसत नाही. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जात नसल्याचेही समोर आले आहे. आधारकार्डवर शिक्के मारुन ऑनलाइन खरेदी - विक्री व्यवहारात गडबड केली जात असल्याचेही समोर आले आहे. शेतकऱ्यांना पैसे मिळत नाहीत, दलाली होत असल्याचेही समोर आले आहे. दरम्यान, यासंदर्भात लवकरच कठोर कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, केंद्र सरकारच्या बफरस्टॉकसाठी शेतकऱ्यांकून खरेदी केल्या जाणाऱ्या कांद्याचे दर यापूर्वी नाफेडच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून ठरवले जात होते. मात्र, आता नाफेड कांदा खरेदीचे दर दिल्लीतून ठरणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होणार असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. पण, प्रत्यक्षात आजही बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या कांद्याला लिलावात मिळणाऱ्या दरापेक्षा नाफेडचे दर कमी असल्याचे दिसतात.

----------

**हाके जिंकले; ओबीसींच्या महाबैठकीत**

प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर चार निर्णय काय-काय घेण्यात आले, याबाबतची सविस्तर माहिती दिली. यापैकी पहिला निर्णय हा जात प्रमाणपत्र हा आधारकार्डशी संलग्न करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला. तर दुसरा निर्णय हा मराठा आरक्षणाच्या सगेसोयरेबाबतचा निर्णय घेण्यासाठी येत्या पावसाळी अधिवेशनात सर्वपक्षीय बैठक बोलवू, असा निर्णय मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत जाहीर केला. तर तिसरा निर्णय हा उद्या सात ते आठ मंत्र्यांचे शिष्टमंडळ ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघामारे यांच्या उपोषणस्थळी जावून त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती करण्याचा घेण्यात आला. तसेच चौथा निर्णय हा मराठा समाजाची जशी उपसमिती आहे, तशी ओबीसींचीदेखील उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला. त्यामुळे हाके हे जिंकले असून त्यांच्या पहिल्या प्रयत्नाला यश आले आहे. त्यामुळे ओबीसींच्या आरक्षणाला हाकेंच्या नेतृत्वात धक्का लागणार नाही, याचा आता विश्वास ओबीसी बांधवांना आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत मंत्री छगन भुजबळ, उदय सामंत, धनंजय मुंडे, अतुल सावे, गिरीश महाजन, संजय बनसोडे, पंकजा मुंडे, गोपीचंद पडळकर आणि प्रकाश शेंडगे हेही उपस्थित होते. याच्यासह लक्ष्मण हाके यांचे शिष्टमंडळीही सह्याद्री अतिथीगृहावरील या बैठकीला हजर होते. यावेळी दि. २२ जून रोजी वडीगोद्री आणि पुणे येथील आंदोलनकर्त्यांची ७-८ मंत्री भेट घेणार असून त्यांना उपोषण करण्याची विनंती केली जाणार आहे. तसेच ओबीसींच्या मागण्यावर सरकार सकारात्मक असल्याचे दिसून आले असले तरी आजच्या बैठकीत कसलाही ठोस निर्णय झाला नाही. तर दि. २९ जून रोजी मुंबई येथे सर्वपक्षीय बैठक घेण्याचे ठरले. सध्या मराठा समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळात समिती आहे. त्याप्रमाणे ओबीसींसाठी समिती नेमण्यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भुमिका घेतली. सगेसोयरेबाबत अधिवेशन काळात सर्वपक्षीय बैठकीत यावर योग्य तो तोडगा काढण्याचे यावेळी ठरले.

------------

**अरे याला शिक्षण द्या आधी,**

लक्ष्मण हाके म्हणाले, मिस्टर जरांगे तुम्हाला आरक्षणातलं पॉईंट शुन्यसुद्धा ज्ञान नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष झाली. मंडल आयोग लागू होऊन २७ ते २८ वर्षे झाली आहेत आणि ७० टक्क्यांचा जावयी शोध जरांगे काढला कुणी? म्हणून मी कायम सांगतो, जरांगे तुमची माझ्यासमोर बोलायची लायकी नाही. तुमच्या सल्लागारांना माझ्यासमोर बोलायला सांगा. कारण मंडल आयोग १९९३-९४ मध्ये लागू झाला आहे आणि ७० वर्षे आणले कुठून? असा सवाल करत लक्ष्मण हाकेंनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. पुढे ते असेही म्हणाले, अरे याला आधी शिक्षण द्या. याला अगोदर पॉलिसी शिकवा. माझी चिडचिड होते मला मान्य आहे. मी थोडसं एकेरी बोलतोय. पण आमच्या या वेदना आहेत, म्हणून हे शब्द येत आहेत, असे लक्ष्मण हाके यांनी म्हटले. जालन्याच्या वडीगोद्री गावात लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचे गेल्या आठ दिवसांपासून उपोषण सुरु आहे. आज सरकारच्या शिष्टमंडळाने भेट घेतल्यानंतर लक्ष्मण हाके बोलत होते.

-------------

**९ मंत्री पाडणार, १३ तारखेनंतर**

एकत्र आले, तर की मला पण दुखत नाही. मात्र, नोंदी रद्द करा अशी मागणी आम्हाला चालणार नाही. कुणबी मराठे एकच आहेत ते लक्षात घ्या, असेही जरांगे पाटील यावेळी म्हणाले. कितीही बदनाम केले, तरी मागे हटू नका. नोंदी रद्द करा म्हणतात ते सहन केले जाणार नाही. राज्यातील ९ मंत्री पाडणार असून १३ तारखेनंतर नावे जाहीर करणार असल्याचे सांगून आम्ही जातीवाद केला असे म्हणतात, मात्र माधवं पॅटर्न कोणी सुरु केला असा सवाल जरांगे यांनी यावेळी उपस्थित केला.

----------

**उच्च न्यायालयाची अरविंद**

सुनावणी नंतर होईल.'' केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना राऊस एव्हेन्यू न्यायालयाच्या न्यायाधीश निया बिंदू यांनी गुरुवारी (दि.२०) दुपारी निर्णय राखून ठेवला होता. मात्र, संध्याकाळी न्यायालयाने केजरीवाल यांना जामीन मंजूर केला. ईडीने केजरीवाल यांच्या जामीनाविरोधात उच्च न्यायालयात अपील करण्यासाठी ४८ तासांचा वेळ मागितला होता. मात्र, न्यायालयाने ईडीची मागणी फेटाळून केजरीवाल यांना जामीन मंजूर केला होता.

------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. २२ जून २०२४



## फ्लाईंग बर्डस् अकॅडमीत आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा

**माजलगाव | प्रतिनिधी**

शहरात योग साधनेचे ज्ञान व्हावे व विद्यार्थी युवकांसह जेष्ठ नागरिकांतही योग प्राणायाम साधनेतून सदृढ आरोग्याची संकल्पना रूढ व्हावी या उद्देशाने फ्लाईंग बड्र्स अकॅडमी योगा ग्रुप ने दि २१ जून २०१५ च्या पहिल्या योग दिना पासून निशुल्क योग प्राणायाम वर्ग सुरु केले आहेत फ्लाईंग बड्र्स योगा ग्रुपच्या या योग शिबिराने आज नऊ वर्ष पूर्ण केल्याने दि २१ जून २०२४ च्या १० व्या आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त फ्लाईंग बड्र्स अकॅडेमीने योग दिन साजरा केला.यावेळी शहरातील जेष्ठ नागरिकांसह शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांनी योग शिक्षक श्री बालाजी गरुड यांचे मार्गदर्शनात या योगसाधना सोहळ्यात सहभाग घेत योग प्राणायामचे धडे घेतले.

सकाळी ६:०० ते ७:०० या वेळेत जेष्ठ नागरिकांनी तर सकाळी ८:०० ते ९:०० या वेळेत शाळेतील विद्यार्थ्यांनी योग प्राणायाम शिबिरात सहभाग घेतला.

यापूर्वी शहरासह तालुक्यातील दिंद्रूड,नित्रूड व आबेगाव सारख्या ग्रामीण भागात अनेक योग शिबीर घेऊन योगाचा प्रचार व प्रसार केला आहे, यात योग परिवारातील स्व.रमेशचंद्र जेथलिया व स्व.अरुणराव शेजूळ सह बीड येथील पंतजली योग समितीतील अनेक योगतज्ञ डॉक्टरांचे मोठे योगदान होते.

# नियमित योगप्राणायाम केल्याने शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती वाढते -अभय कोकड

**माजलगाव | प्रतिनिधी**

नियमित योग, प्राणायाम, ध्यानधारणा केल्याने शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती वाढते व व्यक्ती नेहमी हसतमुख व तंदुरुस्त राहतो असे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे हे होते.

पुढे बोलताना अभय कोकड म्हणाले की, आपल्या भारतामध्ये प्राचीन काळापासून योगाला विशेष अनन्य साधारण असे महत्त्व आहे. महर्षी योगी पतंजली यापासून ते आजचे योगगुरु रामदेव बाबा पर्यंत आपल्या देशामध्ये योगासनाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर त्याची महती वाढवण्याचे काम केले गेले आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये योग या विषयाला जागतिक स्तरावर महत्त्व प्राप्त करून दिले. आज जगभरातील सर्व लोकांना योगाचे महत्त्व कळल्यामुळे शारीरिक तंदुरुस्ती बरोबरच मानसिक तंदुरुस्ती ही तितकीच महत्त्वाची असल्याचे ते म्हणाले.योग केल्यानंतर मानवाच्या शरीरातील कोणतेही विकार बरे होऊ शकतात म्हणून नियमितपणे योगासने करणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले अध्यक्षीय समारोप करताना



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे म्हणाले की आज जगाला योगाचे महत्त्व समजले आहे म्हणून जगातील १८२ देश दि २१ जून हा दिवस जागतिक योग दिवस म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करतात. आपल्या देशाची परंपरा महान तर आहेच परंतु ही परंपरा जगभरात पोहोचवण्याचे काम आपल्या देशातील बऱ्याच योगगुरुनी केली आहे. आपणही नियमित योगासने करून आपली शारीरिक व मानसिक क्षमता वाढवावी असे ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्कृत विभागाचे प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उमेश साडेगावकर यांनी केले तर आभार डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी मानले. यानंतर सर्व कर्मचाऱ्यांनी योगासने प्राणायाम यांचे प्रात्यक्षिक पूर्ण केले.या कार्यक्रमास भा.शि.प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, उपप्राचार्य डॉ.गजानन होंन्ना, डॉ.युवराज मुळये, प्रा.अंकुश साबळे,प्रा.दिनेश गडदे,कार्यालय अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रेम राठोड, डॉ. विकास बोरगावकर, व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न



**परळी | प्रतिनिधी**

येथील लक्ष्मीबाई देशमुख कनिष्ठ महिला महाविद्यालयात १२ वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, संचालिका छाया पत्की, प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, प्रा डॉ विनोद जगतकर यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातून विज्ञान शाखेतून प्रथम ज्योती जुनाळ, द्वितीय मधुरा पोखरकर, तृतीय मयुरी गोरे तर कला शाखेतून प्रथम ऋतुजा कुंभार, द्वितीय प्रिती कुंभार, तृतीय विद्या गंगाधरे यांचा व पालकांचा शाल, पुष्पगुच्छ, मेडल देवून सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील विविध विषयात पहिला, दुसरा, तिसरा क्रमांक पटकावल्या बदल गिफ्ट देवून विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा डॉ विनोद जगतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर अध्यक्षीय समारोप संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख यांनी केला. १२ वीच्या गुणवंत विद्यार्थिनी गुट्टेनी आपले मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन प्रा प्रविण नव्हाडे, आभार प्रा प्रविण फुटके यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक,शिक्षक, पालक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामीण रुग्णालयात योग दिन उत्साहात साजरा

### योगासने अंगीकृत करावित -डॉ.विजय ढवळे

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

आज दिनांक २१/६ रोजी सकाळी ८ वाजता ग्रामीण रुग्णालय धानोरा येथे योग दिना निमित्य सर्व कर्मचाऱ्य, डॉक्टर,सिस्टर,चतुर्थ कर्मचारी, योगा चे असणे करून योग दिन साजरा केला यावेळी धानोरा ग्रामीण रुग्णालयतील मेडिकल सुप्रीटेन डॉ. विजय ढवळे सर यांनी सर्व कर्मचाऱ्यांना योग दिनांचे, हट योगाचे काय महत्व आहे हे सध्याच्या धावपळीच्या जीवनात योग मुळे होणारे फायदे योगामुळे मानवी व चैतन्य योगामुळे ताण तणाव माणसाचे शरीर निरोगी राहण्यास मदत होते तसेच योगामुळे माणूस तणाव मुक्त राहतो या गोष्टीचा आज अनुभव







घेतला योगासन फक्त आजच्या दिवसच करून जमणार नाहीत हा वर्षभर करण्याचा मानस सर्व जनतेने त्यातील कर्मचाऱ्यांनी अंगी बाळगावा आणि रोज सकाळी खास करून कर्मचाऱ्यांनी नोकरीवर किंवा कामावर येताना सर्वानी सकाळी योगा करावयात जेणेकरून आपले आरोग्य सुदृढ राहील आपण सुदृढ राहिलात रुग्णसेवा चांगल्या पद्धतीने करता येईल त्यामुळे आपल्या परिसर आपला देश निरोगी राहील असे आवाहन धानोरा ग्रामीण रुग्णाल्याचे डॉ.ढवळे यांनी केले आहे यावेळी योगाचे प्रशिक्षण योगगुरू देवकते ,डॉ.साखरे, इर्लेकर, आधीपरिचारिका फुले(इंचार्ज) ,होके,शेख तबसूम, निलेश देशमुख, सावळकर,किशोर सोनावणे, सावध मावशी, यांनी योग दिना निमित्त योगासने करून उस्फुर्त प्रतिसाद दिला

## श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात योगदिन साजरा



**माजलगाव | प्रतिनिधी**

जागतिक योग दिन येथील श्री सिद्धेश्वर विद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी सर्वप्रथम तेज आणि बलाचे उपासक हनुमान व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे पूजन करण्यात आले. यावेळी माजलगाव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते. यानंतर गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले व सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी योग शिक्षक तथा पर्यवेक्षक रवींद्र खोडवे यांनी योगासनांच्या विविध प्रकारचे प्रात्यक्षिके व प्राणायाम सर्वांकडून करुन घेतले. यावेळी शाळेचे उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, सीबीएसई च्या प्राचार्या श्रीमती वंदना मिटकरी, माध्यमिक विद्यालय, प्राथमिक विद्यालय, सीबीएसई विभागाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन क्रिडाध्यापक पंडित मेंडके यांनी केले व सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र रवींद्र खोडवे यांनी सांगितला.

## गुणवंतांच्या गुणगौरव सोहळ्यास सर्वांनी उपस्थित रहावे -शैलेश वैजवाडे

**परळी | प्रतिनिधी**

१० वी व १२ वी बोर्ड परीक्षाचा निकाल लागला असून या मध्ये परळी शहरातील विद्यार्थी, विद्यार्थीनीनी मोठ्या प्रमाणात यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल व त्यांच्या कर्तृत्वास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने भावसार युवा सेवाभावी संस्थेच्या वतीने परळी शहरातील गुणवंताचा गुणगौरव व करीअर मार्गदर्शन या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



या कार्यक्रमास संपूर्ण महाराष्ट्राला अभ्यासू आणि तडफदार वक्ते म्हणून परिचीत असलेले सुप्रसिद्ध निर्माते, दिग्दर्शक, गायक, संगीतकार, सुप्रसिद्ध व्याख्याते मा.श्री.गणेशजी शिंदे हे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उच्च न्यायालय, छत्रपती संभाजी नगर येथील प्रसिद्ध विधीज्ञ मा.ॲड. सुनील काकडे,तर प्रमुख पाहूणे भावसार समाजाचे बीड जिल्हाध्यक्ष प्रकाशदादा कानगावकर, भावसार समाज परळीचे अध्यक्ष प्रभाकर हजारे, माहेश्वरी महिला मंडळ परळी अध्यक्ष तथा समाज प्रबोधनकार सौ.दीपाताई बंग व भावसार समाज महिला अध्यक्ष सौ. सारिकाताई तांदळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रात निस्वार्थपणे काम करणार्या संस्थांचा सन्मान व गरजू होतकरू महिलांना शिलाई मशिन वाटप करण्यात येणार आहे. हा गुणगौरव सोहळा रविवार २३ जुन २०२४ रोजी सांय ०५.३० वा श्रद्धा मंगल कार्यालय, पावर हाऊस समोर, परळी वै. येथे होणार आहे. तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भावसार युवा सेवाभावी संस्थेचे सचिव शैलेश प्रेमनाथ वैजवाडे यांनी केले आहे.

## मरण हे क्षणभर तर मरणाचे भय जन्मभर-ह.भ.प.श्रीहरी पुरी महाराज

**आष्टी | प्रतिनिधी**

मरणाच्या वेळी ज्या ज्या पदार्थाचे,वस्तूंचे,भावाचे चिंतन,स्मरण करतो त्याच गतीला जीव पावतो. भगवंत म्हणतात माझी जर प्राप्ती करून घ्यायची असेल तर माझेच स्मरण केले पाहीजे.मानवी जीवनात दोन गोष्टींचे स्मरण असावं. एक देवाचं व दुसरे मरणाचं. मरणाचं स्मरण भगवंताचं स्मरण करून देण्याला कारण ठरते.संत म्हणतात. माणसाला मरणाचे स्मरणं असेल तर त्याला जीवन जगत असतांना कोणत्याही उपदेशाची गरज नाही.तो माणूस म्हणून जगत असतो.या जगात माणसं आहेत, संत आहेत आणि देवही आहे. माणसं अनंत आहेत संत काही एक आहेत.देव मात्र एक आहे.माणसाला स्तुती आवडते पण माणुस स्तुतीच्या पात्रतेचा नसतो. संत स्तुतीच्या पात्रतेचे असतात पण संतांना स्तुती आवडत नाही.देव मात्र स्तुतीलाही पात्र आहे आणि देवाला स्तुतीही आवडते.म्हणून माणसाला जीवनात मृत्युचंही स्मरण असावे, आणि देवाचे स्मरण असावं, देवाच्या नावाने मरण चुकत नाही पण देवाच्या



नावाने मरणाचं भय राहत नाही.मरण वाईट नाही. मरणाचं भय वाईट आहे. मरण हे क्षणभर असते पण मरणाचे भय मात्र जन्मभर असते असे प्रतिपादन ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज यांनी केले.आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथील १०६ वय वर्षाचे पैलवान भगवानबापु बोडखे यांच्या दशक्रियाविधी निमित्त आयोजित प्रवचनसेवेत ते बोलत होते. यावेळी राजेंद्र धोंडे,विठ्ठलराव बन्सोडे,विक्रम पोकळे, दिलीपराव काळे, ह.भ.प.निवृत्तीदादा बोडखे महाराज,ह.भ.प. आप्पासाहेब सुंबरे महाराज,प्राचार्य डा. हरिदास विधाते, उपसभापती नामदेव धोंडे,चेअरमन बबन नन्नवरे,बलभीम सुंबरे, चेअरमन राजाराम नन्नवरे,सेवानिवृत्त पीएसआय शेख अन्सारभाई,अर्जुन खेडकर सर,सुखदेव बोडखे महाराज,सरपंच भीमराव बोडखे,शाम दळवी,प्रा.डा.राम बोडखे, संपतराव धोंडे,भानुदास बोडखे,इंजि.पी.बी. बोडखे,प्रा.डा.जी.पी. बोडखे,अशोक धोंडे, आदि सामाजिक, राजकीय,धार्मिक क्षेत्रातील मान्यवर , ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज पुढे म्हणाले की, भय निवृत्त घाण्यासाठी भगवंताचं स्मरण करीत जावे. काम सोडून देवाचं नाव न घेता आपल्या वाट्याला आलेले कर्म करायचं आणि काम करता करता देवाचे जरी नाव घेतले तर देव जीवाला त्यांच्यासारखच अविनाशी करत असतो. जीवनात भगवंताच्या नामाने त्याची प्राप्ती करुन घेता येते.



## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**माजलगाव | प्रतिनिधी**

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आर्ट ऑफ लिव्हिंगच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. जागतिक योग दिनानिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात योगा व प्राणायाम शिबीर घेण्यात आले.योगा व प्राणायाम शिबिरासाठी तज्ञ मार्गदर्शक नंदकुमार शिंदे व श्रीकृष्ण शेजुळ यांनी योगाचे प्रशिक्षण दिले. यावेळी विजयकुमार साळुंके (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य),प्राचार्य डॉ जी.के.सानप, कार्यक्रमाधिकारी प्रा.उमेश राठोड, कार्यक्रमाधिकारी प्रा.ओमप्रसाद सरगे,प्रा बिलास काळे महाविद्यालयातील प्राध्यापक,कर्मचारी व आर्ट ऑफ लिविंग चे साधक यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## पान ६ वरून...

### स्वराज स्वामीचे शॉक

समजताच कुटूंबातील व्यक्तींच्या दुःखाला पारावार उरला नाही. यावेळी गावात शोककळा पसरली होती. आजी-आजोबा, आई-वडिल, चुलता-चुलती, बहिण, भाऊ ,आत्या आदी नातेवाईकांचा जीव की प्राण असलेल्या स्वराजच्या जाण्याने स्वामी परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. स्वामी कुटुंबीयांच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

### डॉ.राजेश इंगोले यांच्या

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई व मनोहरी अंबानगरी कलाकार कट्टा यांच्या तर्फे केला असल्याची माहिती आयोजक तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, जेष्ठ पत्रकार दत्ताजी अंबेकर, मराठी पत्रकार परीषद, अंबाजोगाईचे अध्यक्ष प्रशांत लाटकर यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. तरी भूमिपुत्राच्या या कौतुक सोहळ्यास व सत्कार सोहळ्यास तमाम अंबाजोगाईकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### जन्म मृत्यू नोंद प्रकरणात

दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे वडवणी वकील संघाने दिला आहे.

वडवणी तहसिल कार्यालय अंतर्गत जन्म-मृत्यु नोंद आदेश करण्याकरीता वकील बांधवानी गेल्या सहा महिन्यापासुन प्रकरणे दाखल केलेले असून सदर प्रकरणाची प्रलंबीत संख्या ही मोठया प्रमाणात असुन यामध्ये कार्यालयातील कर्मचारी हे सदरील संचिकेमध्ये मनमानी करुन व चुकीच्या प्रकारे नियम बाह्य त्रुटी काढून सदरील प्रकरणे प्रलंबीत ठेवत आहेत. यामध्ये वकील बांधवांना जाणुन बुजुन सदरील प्रकरणात आडवणुक करुन मानसिक त्रास देण्यात येत आहे. तसेच गेल्या अनेक महिन्यापासुन प्रकरणे हे आदेशासाठी प्रलंबीत आहेत यामुळे येणाऱ्या शैक्षणीक वर्षात विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागणार आहे व प्रकरण प्रलंबीत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान होणार आहे.तरी वरील नमुद गंभीर प्रश्नांविषयी गेल्या काही महिन्यापूर्वी तहसिलदार साहेब. वडवणी यांना प्रत्यक्ष वकीलांचे शिष्टमंडळ भेटुन याविषयी लक्ष घालुन सदरील प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत अशी विनंती करण्यात आली. तसेच दाखल प्रकरणात किती दिवसांची तारीख द्यावी व प्रकरणात किती दिवसात निकाली काढावे यासाठी वेळापत्रक ठरविण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती. परंतु यावर अद्यापही कसल्याही प्रकारचा तोडगा काढण्यात आलेला नाही.तरी जन्म-मृत्यु नौद प्रकरणात तहसिलदार साहेब, वडवणी यांनी तात्काळ लक्ष देवुन वकील बांधवांची होणारी आडवणुक तात्काळ बंद करावी. अन्यथा वकील संघ वडवणी व संबंधीत अर्जदार हे आपल्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने अंदोलन करतील असा इशारा काल दि.२१ जुन रोजी तहसीलदार यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.या निवेदनावर वकील संघ वडवणीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष, ग्रंथपाल, सदस्य व वकील बांधवांच्या सह्या आहेत.

### जागतिक योगदिना निमित्ताने

सदस्यांच्या वाढदिवसा दिवशी वृक्षारोपण करून ते वृक्ष कसे जोपासले जाईल याकडे सर्वच लक्ष देतात.मैदानातील खडे वेचुन चालणाऱ्यांस कोणतीच आडचण होऊ नये या साठी ट्युब लाईट,व स्वाछता कडे लक्ष देतात व वाढदिवसाच्या निमित्ताने अन्न दान करतात.यावेळी सुप्रभात ग्रुपचे गणेश लोहिया, अविनाश गोंडे,राजु रत्नपारखी,विनोद लड्ढा,आमोल डाके,बाळु मालपाणी,गोविंद भंडारी,वैजनाथ घायतिडक,उमेश जेथलीया,गोपाल मानधणे,रामभाऊ जगताप,अमित श्रीश्रीमाळ,संजय मालाणी,सुदर्श कलंत्री,पवण मुंदडा ही सुप्रभात ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

## मोदी लर्निंग सेंटर येथे जागतिक योगदिन व संस्थेचा २० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

भारत देश हा प्राचीन सांस्कृतिचा देश आहे.देशाच्या अनादी काळापासून साधू संत ,आपले पूर्वज नियमित योग व व्यायाम करत असत. याच योगाला आज नाविन्यपूर्ण अशी सांगड घालत देशातच नव्हे तर संपूर्ण जगभरात २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्याचाच भाग म्हणून आज अंबाजोगाई शहरात मोदी लर्निंग सेंटर येथे योगगुरू तसेच योग अभ्यासक यांच्या सानिध्यात व मार्गदर्शनाखाली योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योगगुरू डॉ डी एच थोरात, योगाचार्य अरुण शिंदे,कुणाल घोरपडे, मार्गदर्शक परमेश्वर होळकर हे उपस्थित होते. यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, प्रा वसंत चव्हाण, ॲड विष्णुपंत सोळंकी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्राचार्य रेंजो आर चंद्रन,विजय रापतवार, सचिन जाधव तसेच संस्थेच्या सर्व शिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी योगासनाचे धडे घेतले.

योग साधनेचे मूल उगमस्थान भारत देशच आहे. नागरिकांनी आपल्या निरोगी आयुष्यासाठी नियमित योगाभ्यास करावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी यावेळी केले आहे. योगाचे महत्त्व पटवून देणे ही काळाची गरज आहे आणि म्हणूनच २१ जून हा आंतरराष्ट्रीय स्तरावर योग दिन म्हणून साजरा करण्यात येत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी नमूद केले. यावेळी मंडळांतर्गत येणाऱ्या सर्व शाळा व महाविद्यालय ज्यामध्ये न्यू व्हिजन पब्लिक स्कुल, कॉलेज ऑफ फार्मसी, डी एड व बी एड महाविद्यालयातील कर्मचारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

याप्रसंगी योगगुरू डी एच थोरात यांनी योग साधनेचे महत्त्व विशद केले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना सांगितले की,



माणसाला जीवन जगत असताना अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा तर आवश्यक असतातच, या गरजांची कमतरता जाणवू लागली की माणसाला जगणे असह्य होते. या सर्व मूलभूत गरजांच्या जोडीला लागणारी गोष्ट म्हणजे उत्तम आरोग्य. उत्तम आरोग्यासाठी आपल्याला नियम करायचा आहे तो नियम म्हणजे दररोज योगा करणे. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आसनांचा समावेश आहे. मानवाला चांगले आरोग्य जगता आले पाहिजे. 'आरोग्यम्? धनसंपदा' या सुविचारातून आपल्याला आपल्या आरोग्याचे महत्त्व कळते. २४ तासांपैकी एक तास आपण आपल्या आरोग्यासाठी म्हणजेच योग साधनेसाठी दिला पाहिजे असे आवाहन डॉ डी एच थोरात यांनी केले.

संस्थेचे सचिव राजकिशोर मोदी यांनी मोदी लर्निंग सेंटरला २० वर्ष पूर्ण होऊन २१ व्या वर्षात पदार्पण करत असल्याबद्दल उपस्थित सर्वांचे अभिनंदन व आनंद व्यक्त केला. २१ वर्षांपूर्वी छोट्याशा जागेवर मोदी लर्निंग सेंटरची स्थापना करण्यात आली होती. येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक भूक व पालकांची आपल्या पाल्याप्रतीची तळमळ याच्या जोरावर या सेंटरवर नवनवीन शैक्षणिक कोर्सेस सुरू करण्यात आले. यामध्ये सीबीएसई स्कुल, डीएड , बीएड, संगणक , फार्मसी तसेच स्वच्छता निरीक्षक व फायरमन चे शिक्षण देणाऱ्या शाखा निर्माण करण्यात आल्याची माहिती संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी दिली आहे.संस्थेच्या वतीने सुरू केलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन देखील याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी केले. आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या जीवनात आपल्या शरीरास नियमित व्यायाम आवश्यक असल्याचे सांगितले. आज प्रत्येकाने योगसाधना व योगाभ्यास केला पाहिजे.शहरी भागात बहुतांश ठिकाणी योग शिबिराचे आयोजन केले जाते. मात्र ग्रामीण भागात अजूनही योगसाधनेचे महत्व कळाले नाही.तेव्हा शहरी भागासोबतच ग्रामीण भागातील नागरिकांनी त्याचबरोबर संस्थेच्या प्रत्येक कर्मचारी वर्गानी देखील योगसाधनेचे महत्व समजून घेऊन आपल्या निरोगी आयुष्यासाठी नियमित योगसाधना करण्याचे आवाहन राजकिशोर मोदी यांनी केले.

त्यानंतर योग प्रशिक्षक अरुण शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित १२०० विद्यार्थी व सर्व कर्मचाऱ्यांना योगाचे धडे दिले. या योग दिनासाठी श्री बालाजी शिक्षक प्रसारक मंडळ अंतर्गत असलेल्या विविध विभागाचे विभाग प्रमुख, प्राचार्य ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी मोठ्या हिरीरीने आपला सहभाग नोंदवून योगशिबिर संपन्न केले. हे उपस्थित होते.

cmyk

# फक्त एक रुपयात पीक विमा आजच करुन घ्या; या पिकासाठी विमा सरक्षण

धकाधकीच्या आयुष्यात आरोग्य विमा गरजेचा झाला आहे, अगदी त्याच पद्धतीने पीक विमा सुद्धा अत्यावश्यक झाला आहे. मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी शेतात ओलावा झाल्याने पेरणी करून घेतली आहे. मात्र, मान्सून सुरु झाल्यानंतर अजून अपेक्षित पाऊस झालेला नाही. त्यामुळे पीके पुन्हा पुन्हा संकटात सापडली आहेत. त्यामुळे पुढील काही दिवसात अपेक्षित पाऊस झाला नसल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत राज्यात खरीप पिकांसाठी विमा भरण्याची सुरुवात झाली आहे.

सरकारच्या अधिकृत पोर्टलवर ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. या वर्षी सुद्धा एक रुपयात पिक विमा मिळणार आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी पिक विमा करावा, असं आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. कोणत्या पिकांसाठी पिक विमा करता येईल? : खरीप २०२४ साठी भात, ज्वारी, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, भुईमूग, तीळ, कारले, कांदा ही १४ पिके पीक विमा



योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत. या पिकांचा विमा भरण्याची अंतिम मुदत १५ जुलै आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला विमा भरून घ्यावा, असे आवाहन करण्यात आलं आहे.

अर्ज भरताना कोणती काळजी घ्यावी? : अर्ज करण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक आहे. पीक विम्याचा अर्ज आधारवरील नावाप्रमाणेच असावा पीक विम्यातील नुकसान भरपाई केंद्र शासनाचे विमा पोर्टल द्वारे आधार संलग्न बँक खात्यामध्ये करण्यात येते. त्यामुळे बँक खाते आधार संलग्न पेमेंट मिळण्यासाठी अधिकृत असणे आवश्यक आहे. यासाठी आपले बँक मॅनेजर माहिती देऊ शकतात आधार कार्डवरील नाव बँक खात्यावरील नावासारखे असावे. शेतकऱ्यांना प्रति अर्ज एक रुपया रुपयाप्रमाणे सीएससी चालकांना द्यावेत योजनेचा ऑनलाईन अर्ज कसा कराल? प्रधानमंत्री पिक विमा योजनेची वेबसाईट ओपन झाल्यानंतर फार्मर ॲप्लिकेशन पर्यायावर क्लिक करा त्यानंतर गेस्ट फार्मर या पर्यायावर क्लिक करा नवीन शेतकरी म्हणून नोंदणी करून सर्व माहिती भरा मोबाईल क्रमांक टाकून व्हेरिफाय करा स्क्रीनवर एक कॅपचा कोड दाखवला जाईल, तो टाकून गेट ओटीपी क्लिक करावं लागेल. सुरुवातीला बँक पासबुक फोटो अपलोड करा डिजिटल सहीचा सातबारा उतारा आणि आठ अ उतारा एकाच पीडीएफ फाईलमध्ये अपलोड करा. दरम्यान, या योजनेमध्ये सामील होण्यासाठी आपण जे पीक घेतलं आहे त्याचाच विमा घ्यायचा आहे. शेतात विमा घेतलेलं पीक घेतलं नसल्यास पिक विमा मिळणार नाही.

## शेतकऱ्यांनो डीएपी खतास 'ही' पर्यायी खते वापरा !



खरीप हंगामात काही ठराविक खताची कमतरता नेहमी आढळते. राज्यामध्ये खरीप पेरणीला सुरुवात झाली असून शेतकरी वेगवेगळ्या खताची खरेदी करत आहे. विशेषतः डीएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी आहे. डीएपी खता मध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत.

डीएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरदयुक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामुळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डीएपी खतास चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके -१०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६ व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याच बरोबर टीएसपी या खता मध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असून डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टीएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखील डीएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डीएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमीन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करण्यात इतर राज्यांच्या मानाने अग्रेसर आहे. जर शेतकर्यांनी उपलब्ध खताचे योग्य व्यवस्थापन केल्यास त्यांना खरीपात खत टंचाई सारख्या समस्येला सामोरा जावे लागणार नाही.

## शाश्वत ग्राम विकासामध्ये पशुपालन आर्थिक कणा - मेधा कुलकर्णी

पुणे : दूध उत्पादन वाढीबरोबरीने दुधाची गुणवत्ता हा महत्त्वाचा विषय आहे. पशू उपचारात अति मात्रेत रसायनांचा होणारा वापर पशूंच्या बरोबरीने मानवी आरोग्यावरही परिणाम करत आहे. त्यादृष्टीने पशुवैद्यक, संशोधकांची जबाबदारी वाढली आहे. पूरक उद्योगातून गावामध्ये लघू उद्योजक तयार होतील. शाश्वत ग्रामविकासाच्या दृष्टीने शेती, पशुपालनाला कृषी पर्यटनाची जोड महत्त्वाची आहे, असे मत खासदार मेधा कुलकर्णी यांनी मांडले.

ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानतर्फे आयोजित गौरव पुरस्कार प्रदान कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून मेधा कुलकर्णी उपस्थित होत्या. पशुसंवर्धन आयुक्तालयात उपक्रमशील पशुतज्ज्ञ आणि पशुपालकांचा गौरव करण्यात आला. या वेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या दूरदृश्य प्रणालीद्वारे कार्यक्रमामध्ये सहभागी झाल्या होत्या. या प्रसंगी पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त डॉ. संतोष पंचपोर, डॉ. रमेश वझरकर, डॉ. अविनाश देशमुख, डॉ. नितीन मार्कंडेय, डॉ. व्यंकटराव घोरपडे आदी पशुतज्ज्ञ उपस्थित होते. या वेळी चारा, पशुखाद्य विशेषांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या वेळी डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, की पशुतज्ज्ञ तसेच प्रयोगशील पशुपालकांचा गौरव हा प्रेरणा देणारा कार्यक्रम आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून आरे कॉलनी येथे पक्षी संग्रहालयाची सुरुवात करण्याचे नियोजन आहे. याचबरोबरीने देशी गोवंश संशोधन आणि संवर्धनाला देखील चालना देण्याचा प्रयत्न आहे. कार्यक्रमामध्ये डॉ. अरुण गोडबोले, डॉ. संतोष शिंदे, कुंदन देशमुख, वैभव पवार, डॉ. प्राणेश येवतीकर, डॉ. चैत्राली आव्हाड, शैला नरवडे, सोमनाथ जाधव यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश वझरकर यांनी केले. डॉ. सुनील राऊतमारे यांनी आभार मानले.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केला उसाचा नवीन वाण

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात नुकतीच संयुक्त कृषी संशोधन आणि विकास समितीची ५२ वी बैठक संपन्न झाली. या तीन दिवसीय संयुक्त कृषी संशोधन आणि विकास समितीच्या ५२ व्या बैठकीत महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेले उसाचे हे नवीन वाण प्रसारित करण्यात आले आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाने 'फुले ऊस १५००६' (एमएस १६०८१) हा उसाचा नवीन वाण महाराष्ट्र राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रसारित करण्यात आला आहे. ऊस हे



महाराष्ट्रातील एक नगदी पीक आहे. पश्चिम महाराष्ट्रासहित मराठवाडा अन उर्वरित राज्यातही कमी अधिक प्रमाणात उत्पादित होणारे एक महत्त्वाचे पीक आहे. यामुळे राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे यासाठी शास्त्रज्ञांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. उसाच्या या नवीन जातीच्या संशोधनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नक्कीच फायदा होणार.

# जाणून घ्या चोर बीटी कापसाची माहिती

विदर्भ, मराठवाड्यात खरीपात मोठ्या प्रमाणात बीटी कापसाची लागवड केली जाते. चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील शेतकरी तेलंगणातील कृषी केंद्रांवर गर्दी करून चोर बीटी कापसाचे वाण खरेदी करतात. तेलंगणाच्या तुलनेत महाराष्ट्रातील बीटी कापूस बियाणे स्वस्त दरात आहे. तरीही शेतकरी अधिक दर देऊन तेलंगणातील कृषी केंद्रातून चोर बीटी कापूस बियाणे खरेदी करीत आहेत. काय आहे या मागचे रहस्य जाणून घेऊ या.

चोर बीटी बियाणे काय आहे?

कपाशीचे चोर बीटी वाण बीजी-३ या नावाने ओळखले जाते. चोर बीटी (बीजी-३) या कापसाच्या वाणाला अद्याप शासनाची परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे शासनाने या बियाण्यांवर बंदी आहे. मात्र तेलंगणातून चोरट्या मार्गाने सदर बियाणे विदर्भ आणि मराठवाड्यात आणली जातात. मागील काही वर्षांपासून शेतकरी कापूस पिकाकडे वळले आहेत. चंद्रपूरमधील सीमावर्ती चामोर्शी, सिरोंचा, मुलचेरा या तालुक्यांमध्ये दरवर्षी कापसाचा पेरा वाढत चालला आहे. कापसाच्या पिकात मोठ्या प्रमाणात गवत उगवत असल्याने गवत काढण्यावर शेतकर्यांना मोठा खर्च करावा लागतो. हा खर्च कमी करण्यासाठी शेतकरी तण नाशकांची मोठ्या प्रमाणात फवारणी करतात.

तण नाशकाची फवारणी केल्यास त्याचा काही प्रमाणात परिणाम संबंधित पिकावरही होतो. मात्र



चोर बीटी या कापसाची लागवड केल्यास या पिकावर तणनाशकाचा काहीच परिणाम होत नाही. त्यामुळे चोर बीटी कापसाची लागवड करून मोठ्या प्रमाणात शेतकरी तणनाशकांचा वापर करतात.

चोर बीटी बियाण्यांमुळे होणारे नुकसान

तणनाशकाच्या अति वापरामुळे शेतजमीन पूर्णपणे नापीक होते. तसेच पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण होतो. अतिशय घातक असलेली तणनाशके वापरली जात असल्याने मानवाला कॅन्सर होतो किंवा त्याचा मृत्यू सुध्दा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने चोर बीटी या बियाण्यांवर बंदी घातली आहे. थोड्याशा फायद्यासाठी शेतकरी या वाणाची लागवड करून स्वत:चा आणि कुटुंबियांचा जीव धोक्यात घालत आहेत. यामुळे पर्यावरणाचे सुद्धा नुकसान होत आहे. तेलंगणातही या बियाण्यांवर बंदी आहे. मात्र तेलंगणा राज्यातून प्रतिबंधित बियाणे गडचिरोली, चंद्रपूरसह मराठवाड्यातील काही जिल्ह्यात आणले जात आहेत. या वाणाची चोरून लागवड केली जाते, म्हणूनच कदाचित या वाणाला चोर बीटी कापूस म्हणतात.

बंदी असलेल्या चोर बीटी कपाशी लागवडीला यंदा चाप बसला. मात्र, सीमावर्ती भागातील शेतकऱ्यांनी महाराष्ट्राऐवजी तेलंगणातील कृषी केंद्रांतून सर्वाधिक कापूस बियाणे खरेदी केली आहेत. बियाणे खरेदीसाठी येथील शेतकरी तेलंगणातील शिरपूर, आशिफाबाद व कागजनगर येथील कृषी केंद्रांमध्ये जात आहेत. तोहोगाव व लाठी परिसरातील शेतकरी कापूस बियाण्यांसाठी तेलंगणात शेकडो किलोमीटर प्रवास करीत आहेत. तेथील विक्रेते दुसर्या शेतकर्यांच्या नावावर बिल फाडत असल्याने बियाणे उगवले नाही तर भरपाईपासून मुकावे लागणार आहे. गोंडपिपरी तालुक्यात कुठलाही उद्योग नाही. केवळ शेतीवरच उदरनिर्वाह चालतो. मात्र कधी नैसर्गिक, तर कधी सुलतानी संकटाचा सामना येथील शेतकऱ्यांना करावा लागतो. बहुतांश शेती नदीकाठावर असल्याने दरवर्षी पुराचा धोका असतो. या भागातील शेतकरी बंदी असलेले चोर बीटी बियाणे लागवड करीत होते. मात्र, हे बियाणे आता विश्वासाचे राहिले नाही. त्यामुळे शेतकरी वैध बियाण्यांकडे वळले आहेत. इतर शेतकर्यांनीही यातून धडा घेऊन मान्यता प्राप्त बियाणे खरेदी करूनच लागवड करावी.




### महत्वाच्या घटना

१५०५ : मुघल सम्राट हुमायू यांनी आपला पुत्र अकबर यांना आपला वारीसदार म्हणून घोषित केलं.
१६३३ : गॅलेलिओ गॅलिली याने पोपच्या दबावाखाली पृथ्वी हाच सूर्यमालेचा केंद्रबिंदू आहे असे कबूल केले.
१७५७ : प्लासीची लढाई सुरू झाली.
१८९७ : चार्ल्स रँड याला दामोदर हरी चाफेकर यांनी पुण्यातील जुलमाचा वचपा म्हणून बंदुकीने गोळ्या घातल्या.
१९०८ : 'देशाचे दुर्दैव' हा जहाल अग्रलेख लिहिल्याबद्दल लोकमान्य टिळकांना ६ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा
१९३१ : फ़र्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वासुदेव बळवंत गोगटे यांनी सर जॉन हॉटसन या मुंबई प्रांताच्या राज्यपालावर गोळया झाडल्या. हॉटसन वाचला. पुढे हे 'हॉटसन' गोगटे पुण्याचे महापौर बनले.
१९३९ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षापासून अलिप्त होऊन स्वता:च्या फॉरवर्ड ब्लॉक या राजनीतिक पक्षाची स्थापना केली.
१९४० : दुसरे महायुद्ध फ्रान्सने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४० : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेसमधुन बाहेर पडुन ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली.
१९४१ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सावरकर सदन येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भेट घेतली.
१९९३ : वेषभूषाकार भानू अथैय्या यांना अमेरिकेतील ॲकेडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट अँड सायन्स या संघटनेचे सदस्यत्त्व देण्यात आले. या सदस्यांना प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्काराबाबत मत देण्याचा अधिकार आहे.
१९९४ : महाराष्ट्र सरकारचे महिलाविषयक धोरण जाहीर झाले. त्याद्वारे सरकारी व निमसरकारी नोकर्यात महिलांना ३० टक्के आरक्षण.
२००१ : जागतिक जलतरण स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा मातब्बर जलतरणपटू इयान थॉर्प याने आपला पहिला विश्वविक्रम केला. त्याने ४०० मीटर फ्रीस्टाईल शर्यत ३ मिनिटे ४०.१७ सेकंद अशा विक्रमी वेळात जिंकली.
२००७ : अंतराळवीर सुनिता विल्यम यांनी सुमारे १९४ दिवस १८ तास पूर्ण करून सर्वाधिक काळ अंतराळात राहून पृथ्वीवर परत आले.
२०१६ : भारतीय अंतराळ संस्था इस्रो ने जागतिक विश्वविक्रम रचत आपल्या देशाच्या उपग्रहासह विदेशातील एकूण २० उपग्रह प्रक्षेपित करण्याचा विक्रम रचला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०५: इटालियन स्वातंत्र्यवीर जोसेफ मॅझिनी यांचा जन्म. (मृत्यू: १० मार्च १८७२)
१८९६ : बाबुराव पेंढारकर, मराठी चित्रपट अभिनेता.
१८८७ : ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ ज्यूलियन हक्सले यांचा जन्म. (मृत्यू: १४ फेब्रुवारी १९७५)
१८९६ : नटश्रेष्ठ बाबुराव पेंढारकर यांचा जन्म.
१८९८ : पं. विनायकराव पटवर्धन शास्त्रीय गायक (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७५)
१८९९ : मास्किंग टेप चे शोधक रिचर्ड गिर्ली ड्र्यू यांचा जन्म. (मृत्यू: १४ डिसेंबर १९८०)
१९०० : भारतीय स्वातंत्र्य सेनानी व राजकारणी गणेश घोष यांचा जन्मदिन.
१९०८ : महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते यांचा जन्म. (मृत्यू: ९ एप्रिल १९९८)
१९२३ : मुकेश चंद माथूर तथा 'मुकेश' पार्श्वगायक. तीस वर्षांच्या फिल्मी कारकिर्दीत त्यांनी १०,००० हून अधिक गीतांना आवाज दिला. ऊर्दू, पंजाबी, तमिळ, बंगाली, मराठी, गुजराथी या भाषांतही त्यांनी गाणी गायली. अनुनासिक स्वर आणि गायकीत ओतप्रोत भरलेलाअ 'दर्द' ही त्यांच्या गायनशैलीची वैशिष्ट्ये होती. (मृत्यू: २७ ऑगस्ट १९७६)
१९२७ : भारतीय-इंग्लिश इतिहासकार आणि शैक्षणिक एन्थोनी लो यांचा जन्म. (मृत्यू: १२ फेब्रुवारी २०१५)
१९३२ : आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त केलेले चित्रपट व रंगमंच कलाकार अमरीश पुरी यांचा जन्म. (मृत्यू: १२ जानेवारी २००५ मुंबई, महाराष्ट्र)
१९३७ : वसंत रांजणे मध्यमगती गोलंदाज (मृत्यू: २२ डिसेंबर २०११)
१९८० : कीर्ती चक्र व सेना पदक सन्मानित माजी भारतीय गोरखा रेजिमेंटम अधिकारी सुनील कुमार चौधरी यांचा जन्मदिन.
१९८५ : भारतीय बास्केटबॉल संघाच्या माजी कर्णधार व बास्केटबॉल खेळाडू अनिता पॉलदुराई यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२७६ : पोप इनोसंट पाचवा.
१४२९ : गियात अल काशी, पर्शियन अंतराळतज्ञ व गणितज्ञ.
१९१८ : इन्दर लाल रॉय पहिल्या महायुद्धातील भारतीय पायलट (जन्म: २ डिसेंबर १८९८)
१९४० : ब्लाडिमार पी. कोपेन, रशियन हवामानशास्त्रज्ञ.
१९५५ : लेगस्पिनर व गुगली गोलंदाज सदाशिव ऊर्फ सदू शिंदे यांचे निधन. (जन्म: १८ ऑगस्ट १९२३)
१९८४ : गजानन लक्ष्मण तथा ग. ल. ठोकळ साहित्यिक व प्रकाशक (जन्म:१९०९)
१९८५ : थोर भारतीय स्वतंत्र सेनानी व समाजसुधारक आणि राजकीय कार्यकर्ता तसचं, आर्य समाज व आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीचे अनुयायी मोहरसिंग राठोड यांचे निधन.
१९८८ : भारतीय बौद्ध भिक्षू, अभ्यासक, प्रवासी व लेखक भदंत आनंद कौसल्यायन यांचे निधन.
१९९३ : चित्रपट अभिनेते विष्णूपंत जोग यांचे निधन.
१९९४ : चित्रपट निर्माते व दिग्दर्शक अक्किनेरी लक्ष्मीवर प्रसाद राव ऊर्फ एल. व्ही. प्रसाद यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९०८)
१९९५ : हेरॉल्ड लारवूड इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १४ नोव्हेंबर १९०४)
२००० : हिंदी भाषिक लेखक व कवी केदारनाथ अग्रवाल यांचे निधन.
२००१ : डॉ. अरुण घोष, अर्थतज्ञ.
२००३ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १८ जून १९६५)
२००३ : कुसय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १७ मे १९६६)
२०१२ : रोमन कॅथोलिक चर्चचे भारतीय धर्मगुरू गिल्बर्ट ब्लेझ रेगो यांचे निधन.
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता रामा नारायणन यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १९४९)

# नियमित योगसाधनेतून विविध विकारांना दूर करता येवू शकते- विष्णुदास बियाणी

## जिल्हा रुग्णालयात जागतिक योग दिवस अत्यंत उत्साहात साजरा



बीड । प्रतिनिधी

दहाव्या जागतिक योग दिनाचे औचित्य साधून शुक्रवार दि.२१जुन २०२४ रोजी जिल्हा रुग्णालय बीड येथील भव्य सभागृहामध्ये जिल्हा शल्यचिकित्सक मा. डॉ. अशोकजी बडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त जिल्हाचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण सर यांच्या प्रमुख उपस्थितीत व योगप्रशिक्षक विष्णुदास बियाणी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली योग दिवस उत्साहात, आरोग्यदायी वातावरणात तसेच डॉक्टर साधकांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन, धन्वंतरी पूजनाने तसेच आंतरराष्ट्रीय योगा मार्गदर्शिकाप्रमाणे करण्यात आली. कार्यक्रमात प्रथमतः योग प्रार्थना घेण्यात आली तर योगतज्ज्ञ विष्णुदासजी बियाणी यांनी मनोगतत व्यक्त करताना सांगितले की प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदीजी यांनी उत्तम आरोग्यासाठी जगाला योगाची प्रेरणा दिली. करा योग रहा निरोग याचा परिचय जवळपास १८८ देशात करून दिला. योगसाधना आज भारतातच नाही तर जगात साजरा होत असून सौ दवा और जिने के लिये केवल आधे घंटे की शुध्द प्राणवायू हवा रुग्णांसाठी वरदान ठरते असे सांगून त्यांनी उपस्थिताना भुजंगासन, पवनमुक्तासन, शवासन, ताडासन, संकष्ठासन, शशांकासन, नौकासन, वज्रासन, शलभासन, द्रोणासन, धनुरासन, मकरासन, भ्रामरी, सुर्य नमस्कार यासह बैठक स्थितीतील, उभे राहून, पाठीवरील व पोटावरील सर्व आसनेही प्रात्यक्षिक व प्रत्येक आसनाचे तत्सम रोगमुक्तीसाठी महत्त्व व उपाय सांगितले. निरोगी काया, प्रसन्न चित्त व आनंद हे योगासाठी आवश्यक जे की मोफत आहे. दवाखाने ही झालेल्या रोगावर बरे करण्यासाठी आहेत तर योगाभ्यास, प्राणायाम हा रोगच होऊ नये यासाठीच नियमितपणे करण्याची आवश्यकता आसल्याचे नमूद केले. सर्व योगसाधकांनी उत्तम आरोग्यासाठी कमीत कमी तीस मिनिटे पायी चालणे व प्राणायाम ही निरोगीपणाची उत्तम लक्षणे असल्याचे प्रतिपादन केले. योगासने नंतर दीर्घश्वसन, नाडीशोधन, अनुलोम- विलोम, कपालभाती ही प्राणायाम करून घेतले त्यानंतर ओंकार मंत्राचे उच्चारण, भ्रामरी, सिंहासन, हास्यासन करून सर्वांनी विकारमुक्तीकरिता विठ्ठल नामाचा घोष करून, टाळ्या वाजवून व्यक्त केली तसेच दोन मिनिटे ध्यानधारणा करण्यात आली. या कार्यक्रमाचा समारोप आरोग्यम पसायदानाने करण्यात आली. योगाभ्यासाकरिता डॉ आयोध्या तेलुरेताई, योगतज्ज्ञ, तसेच योगतज्ज्ञ डॉ . निमकर आनंदकुमार यांचे प्रात्यक्षिकेकरीता अनमोल सहकार्य लाभले, या कार्यक्रमास आवर्जुन डॉ.एल.आर.तांदळे, डॉ. हनुमंत पाखरे सर, डॉ.आनंद कुलकर्णी, मेटॉ रमागिरी, उपप्राचार्या डॉ.शीला मोहिते, डॉ.संगिता महानोर, डॉ.प्रतिक जोशी, प्राध्यापक नर्सिंग कॉलेज, इन्चार्ज रेखा गोतावळे, विद्या गायसमुद्रे, प्रमिला चव्हाण व सर्व शासकीय नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. योगप्रशिक्षक विष्णूदासजी बियाणी यांचा अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांनी तर मत योगदिन व वडसावित्री पौर्णिमा सणाचे औचित्य साधून वड वृक्षाचे रोपटे भेट देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी सभागृहात योग साधकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## आदित्य शिक्षण संस्थेत वज्रासन, उत्तानासन, भुजंगासनाचे धडे

### जागतिक योग दिनानिमत्त उपक्रम २०० विद्यार्थ्यांचा सहभाग

बीड । प्रतिनिधी

जागितक योग दिनानिमित्त शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांनी ठरवून दिलेल्या उद्धिष्टाप्रमाणे व वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्य डॉ.आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांना ताडासन, वृक्षासन, उत्तानासन, शलभासन, सुखासन, वज्रासन, उत्कटासन, त्रिकोणासन, भुजंगासनाचे धडे २१ जून रोजी सकाळी ७ ते ९ असे दोन तास २०० विद्यार्थ्यांना देण्यात आले. यावेळी शरीर, मन व बुद्धीच्या विकासासाठी योग आवश्यक असल्याचे संस्थेच्या सचिव डॉ. आदिती सारडा म्हणाल्या. जागतिक योगा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनींनी योग प्रार्थना म्हणत कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर डॉ.बाळासाहेब पिंगळे यांनी योग विषयक मार्गदर्शन करत योगाच्या अष्टांगाविषयी माहिती देत ताडासन, वृक्षासन, उत्तानासन, शवासन, शलभासन, वज्रासन, उत्कटासन, त्रिकोणासन, भुजंगासन आदि आसने करुन घेतली. विद्यार्थ्यांना सुर्यनमस्कार शिकवले. यावेळी ते म्हणाले योग हा मन : शांती,आरोग्य संपन्नता, आनंददायी जीवनाचा एकमेव मार्ग असल्याचे पिंगळे म्हणाले.

यावेळी आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य, आदित्य दंत महाविद्यालयाचे प्राचार्य,आदित्य अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य, आदित्य ॲग्रि बायोटेक महाविद्यालयाचे प्राचार्य, आदित्य ॲग्रिकल्चर महाविद्यालयाचे प्राचार्य, आदित्य फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य, आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य, आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्यासह आदित्य योग शिक्षक कोर्सचे सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# हाके यांच्या उपोषणाला बंजारा पँथरचा पाठिंबा



बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाजाचे नेते प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे हे मागील आठ दिवसापासून अंबड तालुक्यातील वडीगोंद्री येथे ओबीसी आरक्षण बचावो करीता उपोषण करत आहे.

या उपोषणाला बंजारा पँथरचे अध्यक्ष इंजि.रोहिदास पवार यांच्या नेतृत्वात बंजारा पँथरचा शिष्टमंडळ लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांना दि.२० जुन रोजी दुपारी १ वाजता लेखी जाहीर पाठिंब्याचा पत्र देऊन पाठिंबा दिला आहे,अशी माहिती बंजारा पँथरचे अध्यक्ष इंजि.रोहिदास पवार यांनी पत्रकारांना दिली आहे. तरी या उपोषणाला राज्य सरकारकडून कुठलीही दखल घेतली जात नाही. या उपोषणाला महाराष्ट्रातून ओबीसी समाजाचा प्रचंड जाहीर पाठिंबा मिळत आहे व काही जिल्ह्यांत व तालुक्यात ओबीसी समाज बांधव रस्त्यावर उतरून सरकारचा निषेध व्यक्त करत आहे. तरीपण या गेंड्याच्या कातडीच्या सरकारला जाग येत नाही अशी संताप भावना रोहिदास पवार यांनी केली आहे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः व आपले शिष्टमंडळ पाठवून उपोषणकर्त्यांची भेट घेऊन उपोषणकर्त्यांना लेखी आश्वासन देऊन मागण्या मान्य कराव्या, ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही असे लेखी आश्वासन सरकारने उपोषणाला बसलेले प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांना द्यावेत अन्यथा ओबीसी समाज महाराष्ट्रात मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून आंदोलन,मोर्चे,रस्ता रोको करतील यात कायदा व सुव्यवस्था बिघडली तर याची सर्वस्वी जबाबदारी राज्य सरकारची राहील.

# ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी विद्यार्थ्यांकरिता 'महाज्योती'तर्फे मोफत स्पर्धा परीक्षा

### संकतेस्थळावर ३ जुलै पर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर या स्वायत्त संस्थेमार्फत राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) व विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी) तील विद्यार्थ्यांसाठी मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण राबविण्यात येते. सन २०२४-२५ या वर्षातील स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी महाज्योतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया १९ जून २०२४ पासून सुरु केलेली आहे. सदरचे अर्ज संकेतस्थळावर मागविण्यात आले आहेत.

अर्ज करण्याचा शेवटचा तारीख ३ जुलै २०२४ असून विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेण्याचे आवाहन महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.महाज्योतीमार्फत नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, अभियांत्रिकी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, स्टाफ सिलेक्शन कमिशनचे परीक्षा पूर्व प्रशिक्षण, बँकिंग, एलआयसी, रेल्वे परीक्षा पूर्व प्रशिक्षण या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्ण संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रशिक्षणाबाबतचे सर्व तपशील,निकष, अटी व शर्ती तसेच अर्ज करण्याची सविस्तर प्रक्रिया याबाबतची माहिती या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. महाज्योतीमार्फत प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्यात विद्यावेतन देखील देण्यात येणार असून प्रशिक्षणासाठी रुजू होताना एकरकमी आकस्मिक निधी देखील देण्यात येणार आहे.

सदरचे प्रशिक्षण हे नामांकित प्रशिक्षण संस्थांमार्फत देण्यात येणार असून प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड ही प्रवेश परीक्षा घेऊन करण्यात येणार आहे, असल्याचेही महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी सांगितले. महाज्योतीचे मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेण्यासाठी राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) व विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी) तील विद्यार्थ्यांनी मोठ्याप्रमाणावर विहित कालावधीत अर्ज करावेत.अधिक माहितीसाठी ०७१२-२८७०१२०/१२१ या क्रमांकावर संपर्क करावा.

## सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी अर्ज सादर करावेत

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मान्यता प्राप्त शासकीय शासन अनुदानित, कायम विना अनुदानित महाविद्यालय, तंत्रनिकेतन मध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकरिता वस्तीगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागासवर्ग, जाती व भटक्या जाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवासी शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये. स्वराज ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना कार्यान्वित करण्यासाठी शासनाने वेळापत्रक जाहीर केलेले आहे. सदर योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षापूर्वी घेतलेली १५० विद्यार्थ्यांना, तृतीया वर्षात बीड जिल्ह्यातील १५० विद्यार्थ्यांना व व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना अशा पध्दतीने बीड जिल्यातील ४५० विद्यार्थ्यांना लाभ देण्याचे शासनाने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजने करिता पुढील प्रमाणे नमूद वेळापत्रकानुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शैक्षणिक वर्ष उच्च शिक्षणाचे द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष अर्ज स्विकारण्याची तारीख २१ जून २०२४ अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ जुलै २०२४ असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, बीड या कार्यालयात ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्यात यावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणच्या सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

## ट्रॅक्टर चालवून शेतकऱ्यांचे पीक नष्ट केले

### शेतकऱ्याची न्यायासाठी पोलीस अधिक्षकाकडे धाव

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे अंजनवती येथील शेतकरी सुधिर जालिंदर जाधव यांच्या शेतामध्ये याच गावातील काही लोकांनी ट्रॅक्टर चालवून ८० हजार रुपयांचे सोयाबिनचे पिक नष्ट केले. याबाबत आरोपींकडून शेताचे नुकसान होईल असा विनंती अर्ज यापुर्वीच नेकनूर पोलीस यांना दिलेला होता परंतू पोलीसांकडून कुठलीही कार्यवाही न झाल्याने व दुर्लक्ष झाल्यामुळे आरोपींनी गुरुवार दि.२० रोजी शेतात ट्रॅक्टर घुसवून पिकाचे नुकसान केले याबाबत नेकनूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद होवूनही कारवाई होत नसल्याने सदरील शेतकर्याने पोलीस अधिक्षक यांच्याकडे धाव घेत आरोपींवर कायदेशीर कारवाई करुन नुकसान भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

याबाबत माहिती अशी की, मौजे अंजनवती येथील गट क्र.६६६ मध्ये सुधिर जाधव यांनी सोयाबीनची पेरणी केली होती. सदरील पीक हे चांगल्या प्रकारे उगवून आले असता दि.२०/०६/२०२४ रोजी बबन आश्रुबा जाधव, दिलीप आश्रुबा जाधव, पांडूरंग बालाजी जाधव, गजानन बबन जाधव, सोनु बबन जाधव, रविंद्र दिलीप जाधव, नितीन दिलीप जाधव व ट्रॅक्टर मालक राहुल उत्तम सोनवणे याने ०२ एकर क्षेत्रामध्ये ट्रॅक्टर चालवून सोयाबिनचे पीक नष्ट केले याबाबत सदरील शेतकर्याने दि.१६.०६.२०२४ रोजी अर्ज दिला होता व याची माहिती नेकनूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी व लिंबागणेश चौकीचे जमादार बाबासाहेब डोंगरे यांना दिली होती. मात्र गोसावी व डोंगरे हे गावातील एका अवैध दारु विक्रेत्यामार्फत लाच घेवून आरोपींना पाठिशी घालत आहेत असा आरोप सदरील शेतकर्याने केला आहे. उपरोक्त व्यक्तींवर व पोलीस कर्मचारी यांच्यावर कायदेशीर कारवाई न झाल्यास विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा त्यांनी पोलीस अधिक्षक बीड यांची भेट घेवून दिला आहे.

## वसतीगृह प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बाहेरील पात्र विजाभज इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी इयत्ता १२ वी नंतर उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील विजाभत व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र शासनातर्फे मुला मुलींची वस्तीगृह सुरू करण्यात आलेली असून सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशाचे वेळापत्रक हे सर्व शासकीय वस्तीगृह सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड येथे सूचनाफलकावर लावलेले आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांसाठी शासकीय वस्तीगृह प्रवेश अर्ज इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय बीड येथे विनामूल्य उपलब्ध असून दिनांक २२ जून २०२४ ते २५ जुलै २०२४ या कालावधीत भरून द्यावयाचे आहेत. अर्ज करत असताना संबंधित विद्यार्थ्यांनी वस्तीगृह प्रवेश अर्जासोबत महाविद्यालयाचे बोनाफाईड, आधार कार्ड, बँक पासबुक, मागील वर्षाचे गुणपत्रक, मार्कशीट, टी.सी., शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, दोन फोटो, रहिवासी दाखला इत्यादी आवश्यक कागदपत्रे यांची छायांकित प्रतीसह प्रवेश अर्ज दिनांक २५ जुलै २०२४ पर्यंत सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड यांच्या कार्यालयात सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. दिनांक २५ जुलै २०२४ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा स्वीकार केला जाणार नाही. माहितीसाठी सर्व शासकीय वस्तीगृह, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयात संपर्क साधावा.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी जागतिक योगदिन साजरा



### जिल्हा न्यायालय

बीड : बीड - दिनांक २१ जून २०२४ रोजी जागतिक योग दिनानिमित्त प्राणायाम/योगासनांचा कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांचे वतीने जिल्हा न्यायालय बीड येथील हॉल नं.जी-५, येथे सर्व न्यायिक अधिकारी, कर्मचारी, विधिज्ञ यांचे उपस्थितीमध्ये साजरा करण्यात आला.सदर कार्यक्रमासाठी पतंजली योग समितीच्या श्रीमती देशपांडे व पोरवाल हया योग प्रशिक्षक म्हणून उपस्थित होत्या. सकाळी ठिक ७-०० ते ८-०० या वेळेमध्ये योगाबाबतचे प्रशिक्षण व माहिती प्रशिक्षणार्थ्यांनी व योगामुळे आरोग्यास होणारे फायदे या बाबतची माहिती योग प्रशिक्षकांनी सर्व उपस्थितांना करून दिली. या योग दिन कार्यक्रमास प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, आनंद एल.यावलकर, जिल्हा न्यायाधीश-१ बीड, एस.आर.पाटील, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, जी.जी.सोनी तसेच बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी बीड, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष पी.एस.राजापूरकर व त्यांचे सहकारी, पदाधिकारी तसेच विधिज्ञ व न्यायालयीन कर्मचारी योग शिबीर कार्यक्रमासाठी उपस्थित होते. योग प्रशिक्षक व उपस्थितांचे आभार जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. पी.एस.राजापूरकर यांनी मानले.

### राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय

बीड : राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय व प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालय एम . आय .डी .सी . रोड बीड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जाधव यांनी विद्यार्थ्यांना योगासनाचे महत्त्व सांगितले व आसनक्रिया विद्यार्थ्यांना करण्यास प्रेरित केले. विद्यार्थ्यांनीही जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विविध असणे करण्याचा आनंद घेतला .आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राष्ट्रीय माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो व त्यामुळे आपले मन स्वास्थ्य चांगले राहते. सकस आहार व नियमित योगामुळे आपले शरीर निरोगी राहण्यास मदत होते . शाळेचा अभ्यास व लहान मोठे कार्य आपण उत्साहाने करू शकतो . तेव्हा सर्व



विद्यार्थ्यांनी नियमित योगासने करावीत असे आवाहन केले. या कार्यक्रमास प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पाटील,विद्यार्थी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### केएसपी विद्यालय

बीड : रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयात जागतिक योगदिन उत्साहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, प्रमुख मार्गदर्शक विश्वनाथ गडकर, आर्ट ऑफ लिव्हिंग योग शिक्षक तसेच संस्थाध्यक्षा अंजली शेळके, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

२१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून निवडण्याचे कारणही अत्यंत मोठे आहे. २१ जून हा उत्तर गोलार्धातील सर्वात मोठा दिवस आहे, ज्याला उन्हाळी संक्रांती म्हणतात. यामुळेच या दिवसाची निवड ही आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून करण्यात आली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात योगा, ध्यान, प्रणायाम केले. तसेच आज पासून रोज सकाळी असे योगा, ध्यान, प्रणायाम करुन शाळेत यावे असे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. यावेळी योगाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगतांना आर्ट ऑफ लिव्हींग योग प्रशिक्षक विश्वनाथ गडकर म्हणाले की, पित्त, वात, कफ यापासून शरिरात आजार निर्माण होत असतात आणि योगा केल्याने पित्त, वात, कफ कोणत्याही माणसाला होत नाही. पित्त, वात, कफ हे पुढे अनेक अनेक रोगांना कारक ठरत असतात आणि योगा केल्याने मनुष्याचे जिवन अधिकाधिक सुदृढ होते त्यामुळे कोणत्याही माणसाने नित्य योगा करावा असे ते म्हणाले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### वसंतदादा पाटील महाविद्यालय

पाटोदा: येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते.



याप्रसंगी योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात योग शिक्षक प्रा. प्रदीप मांजरे यांनी प्राणायाम व विविध योगासने यांचे प्रात्यक्षिक केले. योग प्रशिक्षण शिबिरात उपप्राचार्य प्रोफेसर गणेश पाचकोरे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. शिबिराचे आभारप्रदर्शन डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी केले.

# आंतरराष्ट्रीय योगदिन चंपावती क्रीडा मंडळ येथे उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व बीड जिल्हा प्रशासन अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड व जिल्हा परिषद, (शिक्षण विभाग), बीड यांच्या सयुक्त विद्यमाने दि.२१/०६/२०२४ रोजी चंपावती क्रीडा मंडळ, बीड येथे १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मा. जिल्हाधिकारी श्रीमती दिपा मुधोळ मुंडे, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड, श्री. अविनाश पाठक, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वासुदेव सोळुंके, योग गुरू श्री. विनायक वझे अध्यक्ष जिल्हा योग संघटना बीड, श्री. माधव काळकुटे, श्रीमती राधा तांबे, कु. राधिका वझे आदि मान्यवर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या वेळी जिल्हाधिकारी श्रीमती दिपा मुधोळ मुंडे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी योग दिनाच्या बीड जिल्हावासीयांना शुभेच्छा देऊन सर्वांनी नित्य नियमाने योग साधना करावी असे प्रतिपादन करून योग विद्येचे पटवून दिले.






महत्व प्राचीन काळापासून योग-विद्या ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. योगाच्या माध्यमातून शरीर व मन यांच्यामध्ये समन्वय साधला जाऊन शरीर व मन निरोगी ठेवण्याची योग ही एक गुरु किल्ली आहे. श्री. विनायक वझे, श्री. माधव काळकुटे, श्रीमती राधा तांबे व कु. राधिका वझे यांच्याकडून प्रात्यक्षिक

योग प्रोटोकॉल सुरू करण्यात आला. या कार्यक्रमासाठी बीड शहरातील सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी व शिक्षक तसेच योग प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांनी केले. कार्यक्रमाचे आभार श्री. रंगनाथ राऊत, अधिक्षक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी केले. यावेळी श्री. सुर्यवंशी, उपजिल्हाधिकारी, श्री. मोकाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. सुरेश केंद्रे, वित्त व लेखाधिकारी, श्री. जयलाल राजपुत, अधिक्षक सामान्य प्रशासन, नायब तहसिलदार श्री. धनंजय काळे, उपशिक्षणाधिकारी श्री. मोहन काकडे, श्री. नानाभाऊ हजारे, श्री. योगेश आवढाळ जिल्हा संघटक, स्काऊट अँन्ड गाईड, श्री. योगेश करांडे, श्री. जितेंद्र आराक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त जागा तातडीने भरा -माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यात पोलीस पाटील पदाच्या रिक्त जागा अनेक वर्षापासून तशाच आहेत राज्य शासनाकडून या जागा भरण्याबाबत अनेक वेळा सूचना आल्या होत्या मात्र तरीही या जागा भरल्या गेल्या नाहीत पोलीस पाटील संघटनेच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती केली त्यानुसार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे या जागा तातडीने भराव्यात अशा प्रकारचे निवेदन दिले आहे

बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पोलीस पाटलांच्या जागा रिक्त या साठीची बिंदू नामावली अंतिम होऊन आरक्षण ही जाहिर झालेले आहे. परंतु पुढील भरतीची प्रक्रिया सुरु झालेली नाही. अनेक गावातील पदे रिक्त असल्यामुळे पोलीस

प्रशासनाला कायदा व सुव्यवस्थेसाठी अडचण निर्माण होत असून अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. तरी या बाबत तातडिने कार्यवाही करण्यात यावी. बीड जिल्ह्यात सातशे गावांमध्ये पोलीस पाटील पदे आहेत, तिला अनेक गावांमध्ये पोलीस पाटील नसल्यामुळे स्थानिक पोलिसांना देखील या ठिकाणी अडचण निर्माण होऊ लागले आहे अनेक गावच्या कारभारात पोलीस पाटलाची महत्त्वाची भूमिका असते त्यामुळे या जागा भरणे खूप महत्त्वाचे आहे पोलीस पाटील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी माजी मंत्री क्षीरसागर यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती केली आहे त्यानुसार जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन या जागा तातडीने भराव्यात अशी मागणी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केली आहे.

# पाचशे गाड्यांचा ताफा वडीगोद्रीला होणार रवाना

## माजलगावात ओबीसी भटक्या विमुक्त जाती -जमातीच्या समाजाची बैठक संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

ओबीसी आरक्षणाच्या समर्थनार्थ प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांनी मागील आठ दिवसांपासुन सुरू केलेल्या उपोषणास जाहीर पाठिंबा देण्यासाठी माजलगावात ओबीसी भटक्या विमुक्त जाती - जमातीच्या समाजाची दि. २१ जुन रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत ५०० गाड्यांचा ताफा वडीगोद्रीलला जाण्याचा निर्धार करण्यात आला.

मागील आठ दिवसांपासुन प्रा. होके व वाघमारे यांचे उपोषण



सुरू असुन याकडे शासन दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ओबीसी समाजाबांधव रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहे. याच पार्श्वभुमीवर शहरातील शासकीय विश्रामगृहावर ओबीसी समाजाबांधवानी बैठक घेतली असुन आरक्षण बचाव व हाके यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ सकल ओबीसी, भटके विमुक्त समाज माजलगावच्या वतीने दि. २२ शनिवार रोजी सकाळी नउ वाजता वसंतराव नाईक चौक येथुन ५०० गाड्यांचा ताफा घेवुन ओबीसी समाजबांधव वडीगोद्री येथील उपोषणास पाठींबा देण्यासाठी रवाना होणार आहेत.

# स्वराज स्वामीचा शॉक लागून निधन

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील पत्रकार संतोष स्वामी यांचा पुतण्या स्वराज राजेश स्वामी वय १० वर्ष याला कुलरचा शॉक लागल्याने त्याचे दुःखद निधन झाले. शॉक लागताच स्वराजला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले,मात्र डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. चुणचुणीत व सर्वांचा लाडका असलेल्या या गोड मुलाच्या अकाली जाण्याने दिंद्रूड गावावर शोककळा पसरली.



काल दि. २० जून गुरुवारी शाळा सुटल्यानंतर घरी आलेल्या स्वराज ने ग्लास मधील रस पिऊन ग्लास कूलर वर ठेवला. लोखंडी कुलरमध्ये विज प्रवाह असल्याने त्यास जबरदस्त शॉक लागून तो खाली पडला. घरातील नातेवाईकांच्या हे लक्षात आल्यावर त्यांनी तातडीने त्यास गावातील दवाखान्यात आणले. त्याचे शरीर साथ देत नसल्याने स्थानिक डॉक्टरांनी पुढे जाण्यास सांगितले. मात्र माजलगाव येथील एका खासगी हॉस्पीटल मध्ये येण्याअगोदरच रस्त्यात स्वराज ने आपले प्राण सोडल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

दिंद्रुड पंचक्रोशीत ही घटना वाऱ्यासारखी पसरताच सर्वत्र हळहळ व्यक्त होत होती. सतत हसतमुख असणारा स्वराज ने जगाचा निरोप घेतल्याचे ◀◀ पान ३ वर

# डॉ.राजेश इंगोले यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये विश्वविक्रमी नोंद झाल्याबद्दल व इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल



अष्टपैलू व्यक्तिमत्व अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ, नगरपालिकेचे माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांचा गौरव समारंभ रविवार, दिनांक २३ जुन २०२४ रोजी सकाळी ११ वाजता बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भवन, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला आहे. नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन ◀◀ पान ३ वर

# प्रा.हाकेच्या समर्थनार्थ गावंदरा येथे रास्ता रोको

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

वडीगोद्री येथे ओबीसी आरक्षण बचाव साठी आमरण उपोषण करत असलेले प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून धारूर तालुक्यातील गावंदरा येथे ओबीसी समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

धारूर तालुक्यातील गावंदरा येथे खामगाव पंढरपूर महामार्गावर ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनाच्य समर्थनार्थ रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर वाहनांच्या रांगा लागलेल्या दिसल्या.धारूर



तालुक्यातील गावंदरा बस स्थानकात वर गावकऱ्यांच्या वतीने शुक्रवारी सकाळी साडेदहाच्या दरम्यान रस्ता रोको करण्यात आला यावेळी खामगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर धारूर तेलगाव रस्त्यावर दोन्ही बाजूने लांबची लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या यावेळी ग्रामस्थांच्या वतीने वाहनांचे टायर जाळून सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला यावेळी विविध घोषणा देण्यात आल्या त्याचप्रमाणे वडीगोद्री येथे प्रा.लक्ष्मण हाके यांच्या उपोषणातील सर्व मागण्या मंजूर कराव्यात अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली.

# जन्म मृत्यू नोंद प्रकरणात वकील बांधवांची आडवणुक करणाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

## वडवणी वकील संघाने तहसीलदार यांना दिले लेखी निवेदन

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तहसिल कार्यालय अंतर्गत जन्म-मृत्यु नोद आदेश करण्याकरीता वकील बांधवानी गेल्या सहा महिन्यापासुन प्रकरणे दाखल केलेले असून सदर प्रकरणाची प्रलंबीत संख्या ही मोठया प्रमाणात असुन यामध्ये कार्यालयातील कर्मचारी हे सदरील संचिकेमध्ये मनमानी करुन व चुकीच्या प्रकारे नियम बाह्य त्रुटी काढून सदरील प्रकरणे प्रलंबीत ठेवत आहेत. तरी सदरील प्रकरणात वकील बांधवांची अडवणूक करून मानसिक



त्रास देणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांची तात्काळ चौकशी करून कारवाई करावी नसता वडवणी संघ वडवणी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करणार आहे असा इशारा काल दिनांक २१ जून शुक्रवार रोजी तहसीलदार यांना ◀◀ पान ३ वर

# श्री गणेश विद्या मंदिर शाळेत जागतिक योगदिन साजरा

**अंमळनेर । प्रतिनिधी**

अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर व कै. प्रशांत तुकाराम पोकळे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये आज 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला करण्यात आला.संपूर्ण जगभरात २१ जून हा 'जागतिक योग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.त्यानिमित्त आज अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर व कै. प्रशांत तुकाराम पोकळे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला.याप्रसंगी शाळेचे सहशिक्षक श्री आर बी सानप सर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे मानवी जीवनातील महत्त्व सांगून योगाचे विविध प्रकार,विविध प्रकारची आसने यामध्ये पद्मासन,बद्धपद्मासन, तोलासन, वज्रासन, चक्रासन, ताडासन, वृक्षासन, शिर्षासन,



शवासन यांसह विविध आसनप्रकार,सूर्यनमस्कार तसेच मानसिक स्वास्थ्यासाठी आवश्यक असणारे कपालभाती,अनुलोम-विलोम,भ्रामरी इ.प्रकारचे प्राणायाम, ओंकार जप ,ध्यानधारणा यांविषयी विविध प्रात्यक्षिकांद्वारे माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे जेष्ठ शिक्षक एफ एस जाधवर यांनी केले.कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आर एम हाके यांनी सर्व सहकारी सेवकांच्या मदतीने केले.कार्यक्रमामध्ये शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उत्साहाने सहभागी झाले होते.

# जागतिक योगदिना निमित्ताने सुप्रभात ग्रुपच्या वतीने एक तास योगा

**माजलगाव । प्रतिनिधी**

जागतिक योग दिनानिमित्ताने दि २१ जुन शुक्रवार रोजी सकाळी ७:०० वाजता सुप्रभात ग्रुपच्या वतीने. सुंदरराव सोळंके महाविद्यालयात एक तास योगा करून जागतिक योगा दिन साजरा केला.

आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून संपुर्ण जगात साजरा होतो. या योगदिनाच्या निमित्ताने माजलगावातील सुप्रभात ग्रुपच्या वतीने योगासन व प्रानायामाचे दि २१ जुन शुक्रवार रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या खेळाचे



मैदानातील प्रंगणात आयोजन करण्यात आले होते.सुप्रभात ग्रुप मागील दोन वर्षा पासुन नेहमीच आपले सदस्य व मैदानावर मोर्निंगवॉकसाठी येणारे सर्वासाठी व्यायाम व प्रणायाम,रेसचे कार्यक्रम आयोजित करतात.

सुप्रभात ग्रुपने सामाजिक उपक्रम राबविले आहेत. प्रामुख्याने

# जिल्हा कारागृहात महिला डॉक्टरांकडून वृक्षारोपण

## » झाडांची भिशी उपक्रम; स्वखर्चातून हिरवळ फुलवण्याचे ध्येय

**बीड । प्रतिनिधी**

निसर्गाचे असंतुलन पाहता झाडांची किती गरज आहे, याची कल्पना आज सगळ्यांना आहे. मात्र स्वत: यासाठी काहीच करत नाहीत, हेही तेवढेच वास्तव आहे. मात्र स्वखर्चातून हिरवळ फुलवण्याचे ध्येय उराशी बाळगून आतापर्यंत हजारो रोपटे लावलेच नाही तर त्यांचे संगोपनही केले. आज दि. २१ जून रोजी बीड शहरातील झाडांची भिशी या उपक्रमात सहभागी असलेल्या



महिला डॉक्टर आणि डॉक्टरांच्या पत्नींनी जिल्हा कारागृहात वृक्षारोपण केले. यावेळी जेल प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

बीड शहरातील महिला डॉक्टर आणि काही डॉक्टरांच्या पत्नींनी एकत्र येऊन झाडांची भिशी हा उपक्रम सुरु केला. त्यातून त्यांनी आतापर्यंत बीड परिसरात हजारो रोपटे फक्त लावलेच नाही तर त्यांचे संगोपनही केले आहे. झाडांची भिशी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाच्या माध्यमातून या महिलांनी आपल्या परिसरात हिरवळ फुलवायची आहे. त्यामुळे झाडांची भिशी या उपक्रमातील प्रत्येक सदस्य हा दरवर्षी ५ हजार रुपये जमा करतो. त्यातून आवश्यक त्या ठिकाणी वृक्षारोपण करुन त्याचे संगोपनही केले जाते. दि. २१ जून रोजी जिल्हा कारागृहात या महिलांनी वृक्षारोपण केले. यावेळी जिल्हा कारागृह अधिक्षक विलास भोईटे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी युसुफ शेख, एएसआय बलभीम चिंताणी, कर्मचारी ज्ञानेश्वर डोईफोडे, सुधाकर मुंडे, तुकाराम पवार, नागनाथ सुर्यवंशी, महेश मरकड, गोविंद खाडे यांच्यासह झाडांची भिशी उपक्रमातील डॉ. सुनिता अनिल बारकुल, डॉ. वृषाली सुनिल तिडके, डॉ. अंजली नाईकवाडे आदि उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सकारात्मक उर्जानिर्मितीसाठी योगविद्या आत्मसात करा-डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार



**पुणे । प्रतिनिधी**

भारतात प्राचीन काळापासूनच योग हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असून नियमित योगसाधनमुळे व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होते; शरीर सदृढ करण्यासोबत अंगी सकारात्मक उर्जा निर्मितीसाठी प्रत्येकांनी योगविद्या आत्मसात करावी, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.

आंतराष्ट्रीय योग दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालय आणि ऑर्ट ऑफ लिव्हिंगच्या संयुक्त विद्यामाने विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपायुक्त वर्षा लड्डा-उंटवाल, निलीमा धायगुडे, ऑर्ट ऑफ लिव्हिंगच्या श्रीमती योगश्वरी भट, डॉ. प्रशांत योगी, वंदना जैन आदी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत शरीरासह मन निरोगी राहणे महत्वाचे आहे. अनेक ताणतणावांना सामोरे जातांना आपल्या अंगी सकारात्मक उर्जा असावी लागते. सकारात्मक उर्जा अंगीकारुन समाजातही ती रुजविणे गरजचे आहे. योगसाधनेमुळे शरीर आणि मन निरोगी राहण्यासोबतच बुद्धीमत्तेत वाढ होण्यासोबत दैनंदिन कार्यशैलीत अनुकूल बदल होण्यास मदत होते, त्यामुळे प्रत्येकांनी नियमितपणे योग व ध्यानधारणा करावी, असे आवाहन डॉ. पुलकुंडवार यांनी केले.

यावेळी श्रीमती जैन यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना योगाचे प्रात्याक्षिक करुन दाखविले तर डॉ. योगी यांनी मानसिक कार्यक्षमता वाढीसाठी तणावमुक्तीच्या प्रयोगाबाबत मार्गदर्शन केले.

# एमआयटी एडीटी विद्यापीठात महायोग उत्सव!

**पुणे । प्रतिनिधी**

येथील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सामूहिक योगासनांच्या प्रात्यक्षिकांद्वारे गेल्या महिनाभरापासून चालू असणाऱ्या 'महा'योग उत्सवाचा समारोप करण्यात आला. समग्र विश्वाला शांतीचा संदेश देणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज विश्वशांती घुमटाच्या साक्षीने झालेल्या या योगउत्सवात विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह लोणी-काळभोर व कदमवाक वस्ती ग्रामपंचायतीतील शेकडो नागरिकांनी उत्फुर्तपणे सहभाग नोंदवत आपले शरीर सदृढ ठेवण्यासाठी दररोज योग प्रात्यक्षिक करण्याचा निश्चय केला.

भारत सरकारचे आयुष मंत्रालय, आंतरराष्ट्रीय नॅचरोपॅथी संघटना, मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान, आर्ट ऑफ लिविंग, सुर्या



फाउंडेशन, एमआयटी वर्ल्ड पीस विद्यापीठ आणि एमआयटी एडीटी विद्यापीठाचे स्कुल ऑफ हॉलिस्टिक डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या भव्य कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा कुलगुरू प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनिता कराड, प्र.कुलगुरू डॉ.मोहित दुबे, डॉ.अनंत चक्रदेव, डॉ.रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, कार्यकारी संचालक, एमआयटी एडीटी विद्यापीठ परीक्षा नियंत्रक डॉ.ज्ञानदेव नीलवर्ण, डॉ.शिवशरण माळी, क्रीडा विभाग प्रमुख प्रा.पद्माकर फड, डॉ.सुराज भोयार आदी याप्रसंगी उपस्थित होते. प्रास्ताविकात बोलताना कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक डॉ.अतुल पाटील यांनी योग दिनाचे निमित्ताने गेल्या महिनाभर आयोजित केलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले, योग दिनानिमित्त महिनाभर विद्यापीठाच्या योग प्रशिक्षकांनी लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीतील ग्रामस्थ व आसपास असणाऱ्या कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी रोज सकाळी योग शिबिरे आयोजित केली होती. यासह, विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी अनेक स्पर्धांचे आयोजन यानिमित्ताने करण्यात आले होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना, प्रा.डॉ. कराड म्हणाले, आज केवळ भारतातच नव्हे तर समग्र जगात आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्सवात साजरा होत आहे. योगामुळे केवळ शारीरकच नव्हे तर माणसिक आरोग्य देखील आबाधित राहते. त्याचमुळे, एमआयटी एडीटी विद्यापीठाने मोठ्या उत्साहात हा दिन साजर केला असून, विश्वशांती घुमटाच्या साक्षीने शारीरिक स्वास्थ्य आबादीत राखण्याचा संदेश दिला आहे.

विश्वशांती प्रार्थनेने सुरू झालेल्या या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# एलंटास बेक इंडिया प्राय. लि. कंपनी तर्फे जागतिक योग दिवस साजरा

**पुणे । प्रतिनिधी**

एलंटास बेक इंडिया प्राय. लि. कंपनी तर्फे दि. २१ जून २०२४ रोजी जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमामध्ये एलंटास बेक इंडिया प्राय. लि. कंपनीचे श्री. संजय कुलकर्णी (सी. फ.ओ) एलंटास बेक इंडिया प्राय, लि, श्री, विकास कर्नावट, कार्यक्रमाचे अध्यक्ष, श्री. निलेश अभंग, कार्यक्रमाचे उपाध्यक्ष, अनुश्री अंतरकर (प्रशासकीय अधिकारी आणि संयोजक) एलंटास बेक इंडिया प्राय. लि ई. अधिकारी व मान्यवर आणि कर्मचारीवर्ग आदींचा सहभाग होता.

कंपनी चे सी.फ.ओ यांनी लोकमान्य च्या योगा टीम चे व प्रशिक्षकांचे स्वागत केले आणि आपल्या सहकाऱ्यांना योग प्रशिक्षणा करीत प्रोत्साहन दिले.जागतिक योग दिनाच्या कार्यक्रम उदघाटन प्रसंगी लोकमान्य मेडिकल रिसर्च सेंटर चे







संचालक श्री. श्रीनिवास पत्तार यांनी जागतिक योग दिनाचे ब्रीद योगा फॉर सेल्फ अँड सोसायटी या विषयावर आपले मत मांडले. योग व्यक्ती आणि समाज दोघांनाही सखोल फायदे देते. वैयक्तिक स्तरावर, योगा सुधारित लवचिकता, सामर्थ्य आणि संतुलनाद्वारे शारीरिक आरोग्य वाढवते, तसेच तणाव, चिंता आणि नैराश्य कमी करून मानसिक आरोग्यास प्रोत्साहन देते. नियमित सराव आत्म-जागरूकता, सजगता आणि आंतरिक शांतता वाढवते, ज्यामुळे संतुलित आणि सुसंवादी जीवन जगता येते, तसेच योग साधनेमुळे आध्यात्मिक व आंतरिक शांतता मिळण्यास लाभ होतो.योगामुळे वैयक्तीक जागृकतेतून सामाजिक जागरूकता आणण्यास मदत होते तसेच राष्ट्रीय निरोगी स्वास्थ्यतेसाठी अमूल्य हातभार लागतो. तत्पश्चात डॉ. राम साकळकर यांनी योगा विषयी सविस्तर माहिती दिली आणि अष्टांग योग मधील वैयक्तीक जागरूकते साठी तसेच सामाजिक जागरूकते करता योग मधील यम आणि नियम यांचे महत्व समजावून दिले, तसेच आयुष मंत्रालयद्वारा प्रसिद्ध करण्यात आलेल्या योगा प्रोटोकॉल मधील आसनांचे महत्व आणि फायदे याची सविस्तर माहिती दिली. डॉ. संगीता भोळे यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रात्यक्षिके व प्रशिक्षण देण्यात आले सदर कार्यक्रमास एकूण ९० अधिकारी व कर्मचारी वर्गाचा सहभाग व प्रतिसाद होता. कार्यक्रमामध्ये लोकमान्य मेडिकल रिसर्च सेंटर तर्फे निखिल दंडगव्हाळे आणि आकाश राठोड यांचे सहकार्य लाभले.

# जागतिक मधमाशा पालन दिनानिमित्ताने पुण्यात २५ जून रोजी मधुमित्र व मधुसखी पुरस्काराचे वितरण

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने सन २०२३-२४ या वर्षातील 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कार घोषित केले असून जागतिक मधमाशाक पालन दिनाचे औचित्य साधून या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन २५ जून रोजी सकाळी ११ वाजता पुण्यातील साखर संकुल सभागृह येथे करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या मध संचालनालय, महाबळेश्वर येथील कार्यालयाच्यावतीने २०२३ पासून 'मधुमित्र पुरस्कार योजना' सुरू करण्यात आली आहे. मधमाशा पालन हा व्यवसाय निसर्ग संवर्धनासाठी व शेती उत्पादन वाढीसाठी उपयुक्त आहे. मधमाशांची भुमिका महत्वाची असल्याने या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळावे हा पुरस्कारामागील प्रमुख उद्देश आहे.

या आर्थिक वर्षातील प्रथम मधुमित्र पुरस्कार राजू भाऊसाहेब कानवडे मु.पो. अंबड ता.अकोले जि. अहमदनगर, द्वितीय मधुमित्र पुरस्कार दत्तू नारायण खेरगुडे मु.पो.पिर्ली ता. भद्रवती, जि. चंद्रपुर तर तृतीय मधुसखी पुरस्कार कु. योगिता प्रभाकर इंगळे मु.पो.माकेंडा ता.दर्यापुर जि. अमरावती यांना घोषित झाले आहेत. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे, आमदार सिद्धार्थ शिरोळे व मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती आर. विमला यांच्या शुभहस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. मधमाशा पालन क्षेत्रात काम करणाऱ्या व मधमाशा पालन विषयात आवड असणाऱ्या नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी सतिश खरात यांनी केले आह.

# भीमा कोरेगाव दंगलीतील आरोपी महेश राऊतला अंतरिम जामीन

**पुणे । प्रतिनिधी**

भीमा कोरेगाव दंगल प्रकरणातील आरोपी महेश राऊतला आजीच्या अंत्यविधीचे सोपस्कार पार पाडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि.२१ जून) दोन आठवड्यांचा अंतरिम जामीन मंजूर केला.

राऊतच्या जामीन अर्जावर विक्रम नाथ आणि एस. व्ही. एन. भाटी यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. आजीच्या अंत्यसंस्कारानंतर केल्या जाणाऱ्या विधीसाठी २६ जून ते १० जुलैपर्यंत अंतरिम जामीन मंजूर करावा, अशी मागणी राऊतच्या वकिलाने केली. न्यायालयाने ती मान्य केली. महेश राऊतला यापूर्वी जून २०१८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. मात्र, एनआयए या तपास संस्थेने विरोध केल्यानंतर न्यायालयाने जामीनाला स्थगिती दिली होती.

# विधानसभेच्या कामाला लागा !

## शरद पवार यांचे कार्यकर्त्यांना आवाहान, पुण्यात घेतली नवनिर्वाचित खासदारांची बैठक

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. या यशात सर्वाधिक वाटा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा आहे. शरद पवार यांचा स्ट्राईक रेट महाविकास आघाडीत सर्वाधिक आहे. शिवसेना उबाठाकडून सर्वाधिक २१ जागेवर उमेदवार उभे करण्यात आले होते. काँग्रेसकडून १७ तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाकडून दहा जागांवर उमेदवार उभे करण्यात आले होते. त्यात काँग्रेसला १३, शिवसेनेला ९ तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला दहा पैकी ८ जागांवर विजय मिळाला. त्यामुळे आता शरद पवार यांनी विधानसभेसाठी व्यूहरचना सुरु केली आहे. लोकसभेत राष्ट्रवादी काँग्रेसला जास्त जागा मिळायला हव्या होत्या, असे शरद पवार यांनी शुक्रवारी म्हटले आहे.



शरद पवार गटाच्या नवनिर्वाचित खासदारांची पुण्यात आज बैठक झाली. या बैठकीत शरद पवार आणि जयंत पाटील उपस्थितीत होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली. बैठकीला शरद पवार गटातील राज्यातील सर्व खासदार उपस्थित होते. त्यात बोलताना शरद पवार यांनी सांगितले की, महाविकास आघाडीतील एकजूट राहवी म्हणून मी दोन पावले मागे आलो. खरंतर लोकसभेला आपल्या पक्षाला जास्त जागा हव्या होत्या. परंतु आता कार्यकर्त्यांनी विधानसभेच्या तयारीला लागावे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत बोलताना शरद पवार यांनी मोठे विधान केले. ते म्हणाले की, आपल्याला लोकसभेला जास्त जागा मिळायला हव्या होत्या. मात्र महाविकास आघाडीची एकी राहवी यासाठी मी दोन पाऊल मागे आलो. एकत्रित राहिलो म्हणून यश मिळाले. आतापासून विधानसभेच्या कामाला लागा. राज्य हातात घ्यायचं आहे याची तयारी ठेवा. लोकांची जास्तीत जास्त काम करा. लोकांचा फारसा संबंध दिल्लीत येत नाही. राज्यात प्रश्न महत्वाचे असतात. त्यामुळे विधानसभेच्या कामाला लागा, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

# येरवडा येथील क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**पुणे । प्रतिनिधी**

विभागीय क्रीडा संकुल समिती, जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व समाजकल्याण विभागाच्यावतीने व कैवल्यधाम आऊटरिच या संस्थेच्या सहकार्याने येरवडा येथील विभागीय क्रीडा संकुल येथे १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

योग दिनाच्या कार्यक्रमात उपसंचालक युवराज नाईक, तहसिलदार दिलीप आखडे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, सहायक समाजकल्याण आयुक्त मल्लिनाथ हरसुरे याच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक, येरवडा येथील गेनबा मोझे शाळेतील विद्यार्थी आदींनी सहभाग घेतला.

याचबरोबर जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा संकुल, बारामती, तालुका क्रीडा संकुल मंचर, इंदापूर व खेड, पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शाळा व जिल्ह्यातील सर्व अनुदानित व विनाअनुदानीत शाळा, महाविद्यालयात योगदिनाचे आयोजन करण्यात आले. योग दिनाच्या कार्यक्रमात जिल्ह्यातील एकूण २ लाख ८३ हजार नागरिक, अधिकारी-कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी दिली.

# तरुणांच्या नैराश्यात वाढ; टेलिमानस सेवेद्वारे ८० हजारांपेक्षा अधिक जणांवर उपचार

**पिंपरी । प्रतिनिधी**

मोबाईलच्या अतिआहारी गेलेली तरुणाई, तारुण्यात विरुद्धलिंगी व्यक्तीविषयी वाटणारे आकर्षण आणि त्यातून करिअरकडे होणारे दुर्लक्ष, व्यसनांच्या आहारी जाऊन स्वतःवरील नियंत्रण हरवून बसणे अशा विविध मानसिक समस्यांनी तरुण नैराश्याच्या गर्तेत जात असल्याचे निरीक्षण केंद्र सरकारच्या टेलिमानस दूरध्वनी सेवेच्या माध्यमातून काम करणार्या काही समुपदेशकांनी नोंदविले आहे.



या सेवेचा गेल्या दोन वर्षांमध्ये ८० हजारांपेक्षा अधिक जणांनी लाभ घेतला आहे. त्यामध्ये तरुणांचे प्रमाण मोठे आहे. तरुणांबरोबरच छोट्या-मोठ्या कारणांनी निराश होणार्या व्यक्तींचे समुपदेशन करून त्यांना नैराश्येतून बाहेर काढण्याचे काम या सेवेच्या माध्यमातून होत आहे. टेलिमानस - 'मनोविकारावरील दूरध्वनीद्वारे सल्ला' ही सेवा राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमाचा एक भाग आहे. १० ऑक्टोबर २०२२ पासून या सेवेला सुरुवात झाली. या सेवेचा भ्रमणध्वनीद्वारे लाभ घेण्यासाठी १४४१६ तर, लँडलाईनसाठी १८००८९१४४१६ हे टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महाराष्ट्रात ही सेवा एकूण ४ केंद्रांच्या माध्यमातून सुरू आहे. त्यामध्ये ठाणे,

पुणे आणि अंबेजोगाई (बीड) येथील केंद्रांचा खर्च केंद्र सरकारमार्फत करण्यात येतो. तर, नागपूर येथील केंद्र सीएसआरअंतर्गत आदित्य बिर्ला ग्रुपच्या माध्यमातून चालविण्यात येत आहे. या टोल फ्री क्रमांकाच्या माध्यमातून क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट, सायक्याट्रिक नर्स आणि सायक्याट्रिक सोशल वर्कर समुपदेशनाचे कार्य करीत आहे. या सेवेसाठी मनोविकृतीतज्ज्ञदेखील नियुक्त केलेले आहेत. प्रत्येक केंद्रावर एकूण २० जणांचे पथक त्यासाठी नियुक्त केले आहे.

# फ्लॉवर १००; हंगामात उच्चांकी भाव मिळत असल्याने शेतक्यांमध्ये समाधान

**पुणे । प्रतिनिधी**

(ता. पुरंदर) परिसरात फळबागांबरोबरच तरकारी भाजीपाल्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. सध्या येथील फ्लॉवर उत्पादक शेतकरीवर्गात आनंदाचे वातावरण पहावयास मिळत आहे. यंदाच्या हंगामातील फ्लॉवरला उच्चांकी दर मिळू लागला आहे. प्रतिकिलोला ३५ रुपयांना फ्लॉवरची विक्री होत आहे.



यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे पुरंदर तालुक्यातील फ्लॉवरच्या उत्पादनात काहीसी घट झाली आहे. मात्र अशाही परिस्थितीत काही शेतकर्यांनी पुरंदर उपसा जलसिंचन योजना, शेततळे तसेच कुपनलिकेच्या उपलब्ध पाण्यावर फ्लॉवरचे दर्जेदार उत्पादन घेतले आहे.

येथील नितीन टिळेकर, रेश्मा टिळेकर, पांडुरंग गायकवाड आणि मनोज झेंडे या शेतकर्यांनी मे महिन्यात नर्सरीमधून तयार फ्लॉवर रोपे आणून लागवड केली. सुरवातीला शेणखत, गरजेपुरती रासायनिक खते वापरली. त्यानंतर पाण्याचे वेळेवर नियोजन करून औषध फवारणी केली. त्यामुळे कडक उन्हाळ्यातही पीक जोमदार आले. सध्या फ्लॉवरची काढणी सुरू आहे. फ्लॉवरला प्रित किलोला ३५ रुपयांचा बाजारभाव मिळत आहे. तर बाजारात फ्लॉवरला मागणीदेखील वाढली आहे. किरकोळ बाजारात तर फ्लॉवर १०० रुपये किलोच्या पुढे विकला जात आहे.

टिळेकर यांनी ३० गुंठे क्षेत्रावर सीताफळ बागेत आंतरपीक म्हणून ५ हजार फ्लॉवरच्या रोपांची लागवड केली होती. त्यांना आत्तापर्यंत ५० हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. अजून ३५ हजार रुपये उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे.

# विशाल अग्रवालला जामीन मंजूर, पण सुटका नाहीच

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याच्या कल्याणी नगर येथील अपघात प्रकरणातील मुख्य अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल याला जामीन मंजूर झाला आहे. पुणे सत्र न्यायालयाने काही अटीशर्तींवर विशाल अग्रवालला जामीन मंजूर केला आहे.

पुणे हिट अँड रन प्रकरणी मोठी बातमी समोर येत आहे. पुण्याच्या कल्याणी नगर येथील अपघात प्रकरणातील मुख्य अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल याला जामीन मंजूर झाला आहे. पुणे सत्र न्यायालयाने काही अटीशर्तींवर विशाल अग्रवालला जामीन मंजूर केला आहे. विशाल अग्रवालला आज जामीन मंजूर झाला असला तरी त्याला तपास यंत्रणांना तपासासाठी सहकार्य करावं लागणार आहे. याच अटीच्या आधारावर विशाल अग्रवालला जामीन मंजूर करण्यात आला आहे. असं असलं तरीही विशाल अग्रवालची आज सुटका झालेली नाही. त्याची रवानगी आज पुन्हा येरवडा कारागृहात करण्यात आली आहे. विशाल अग्रवाल याच्यावर दाखल असलेल्या तीन गुन्ह्यांपैकी एका गुन्ह्यात जामीन मिळाला आहे. मात्र इतर दोन गुन्ह्यांत तो न्यायालयीन कोठडीत राहणार आहे. त्यामुळे विशाल अग्रवाल याचा मुक्काम येरवडा कारागृहातच राहणार आहे. विशाल अगरवला याच्या अल्पवयीन मुलाने भरधाव कार चालवून दोघांचा जीव घेतला होता. मुलगा अल्पवयीन आहे आणि दारूच्या नशेत होता. विशाल अग्रवालवरती येरवडा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात विशाल अग्रवाल याला जामीन देण्यात आला.